पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

गुरुवार, दि. ०२ एप्रिल २०२६ | वर्ष : १३ | अंक : ३३९ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in | E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ बाबीतळा राहाटीत आज श्री कुलस्वामी खंडेराया यात्रा

४ भगवान महावीरांना पुणतांब्यात अभिवादन

५ युडीआयडी सक्तीवर प्रहार संघटनेची टीका;



पान ८ वर..

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ; मंत्रिमंडळ बैठकीत सहा महत्त्वाचे निर्णय

## नद्या पुनरुज्जीवन,क्रीडा संकुल आणि आरक्षण उपवर्गीकरण समितीलाही मंजुरी

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे शिशुवर्ग ते आठवी, नववी ते दहावी तसेच अकरावी व बारावीत शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत भरीव वाढ होणार आहे.

दिव्यांग सक्षमीकरण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या या योजना ८ ते ३४ वर्षे जुन्या आहेत. या योजनांमध्ये कालानुरूप बदल करणे आवश्यक असल्याने तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मध्ये दिव्यांगांना सामान्य व्यक्तीपेक्षा अधिक लाभ देण्याची तरतूद आहे. त्यानुसार दिव्यांगत्वाच्या सर्व २१ प्रकारातील राज्यातील शिशुवर्ग ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ५०० रुपये, नववी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ८०० रूपये (निवासी), ६०० रूपये (अनिवासी), अकरावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा १००० रूपये (निवासी), ८००



रूपये (अनिवासी) शिष्यवृत्ती देण्यात येईल. यापूर्वी शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा १०० ते २०० रूपयांच्या दरम्यान होती.

भारतात १० प्रमुख नद्या आहेत. त्यापैकी ४ नर्मदा, तापी, गोदावरी व कृष्णा या महाराष्ट्रात आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०२५ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार देशभरात २९६ प्रदूषित नदी–पट्टे असून त्यापैकी सर्वाधिक प्रदूषित नदी–पट्टे ५४ महाराष्ट्रात आहेत. यात मिठी, काळू, मुळा, मुळा–मुठा, मुठा, भीमा, पवना, नाग, चंद्रभागा, पंचगंगा अशा नद्यांचे प्रदूषण–पुनरूज्जीवन याबाबत निर्णय घेता येणार आहे. अमरावती महापालिकेला क्रीडा संकुलासाठी मौजे नवसारी येथील १६ हजार ७९८ चौ.मी.जमीन देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या जागेवर क्रीडा सुविधांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण, अर्जांबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाबाबत उपवर्गीकरण समितीच्या अहवालावर राज्य मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा झाल्यावर या विषयावर प्राप्त निवेदने, अर्जांचा विचार करण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

भूमि अभिलेख विभागातील गट क संवर्गातील भूकरमापक हे पद रद्द करून परिरक्षण भूमापक असे पद निर्माण करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला.

# आर्थिक वर्षाच्या प्रारंभीच व्यावसायीक सिलिंडर महागले

## हॉटेलमधील जेवण महागणार

**जनप्रवास । प्रतिनिधी**



पुणे : अमेरिका–इस्त्रायल–इराण युद्धाच्या झळा जगाला बसत आहेत. इंधनाच्या तुटवडा लक्षात घेता यात मोठी वाढ होत असल्याने चिंता वाढली आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी १९५ रुपयांनी वाढ झाली आहे.

व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात वाढ सलग चौथ्या महिन्यांत वाढ झाल्याने हॉटेल–रेस्टॉरंट मालकांचे कंबरडे मोडले आहे. परिणामी खाद्यपदार्थ – जेवण महागण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही ठिकाणच्या हॉटेलमध्य यापूर्वीच दरवाढ झाली आहे.

व्यावसायिक सिलिंडरच्या किंमतीत वाढ झाली असली तरी घरगुती एलपीजी सिलिंडर आणि विमान इंधनाच्या म्हणजेच एटीएफच्या दरात कोणतीही वाढ झाली नसल्याचे पेट्रोलियम कंपन्यांनी स्पष्ट केले आहे. घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात ७ मार्च रोजी वाढ करण्यात आली होती. व्यावसायिक सिलिंडरचे दर वाढल्याने हॉटेल, रेस्टॉरंट आणि लहान कारखानदारांच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ होणार आहे.आगामी काळात बाहेरचे जेवण आणि इतर सेवा महागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

बीपीसीएल, आयओसी, एचपीसीएल यांसारख्या सरकारी तेल कंपन्यांनी आजपासून १९ किलोंच्या व्यावसायिक सिलिंडरच्या दरात वाढ केली आहे. १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात कोणतीही वाढ झालेली नाही. नवीन दर आजपासून लागू झाले आहेत. नवी दिल्लीत १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलेंडरची किंमत २,०७८.५० रूपये झाली आहे. कोलकातामध्ये २,२०८.०० रूपये तर चेन्नईमध्ये गॅस सिलिंडर २,२४६.५० रूपयांना मिळणार आहे. मुंबईमध्ये आता गॅस सिलिंडरची किंमत २,०३१ रूपये झाली आहे. ही माहिती इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या वेबसाइटने दिली आहे. इस्त्रायल–इराणच्या संघर्षामुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. त्यामुळे तेलांच्या किंमतीत ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. दोन्ही देशात युद्ध सुरु झाल्यानंतर तिसऱ्यांदा ही दरवाढ झाली आहे.

## संक्षिप्त

### महिला पत्रकाराशी गैरवर्तन; स्वयंघोषित रील स्टार संतोष पंडितवर गुन्हा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : सोशल मीडियावरील स्वयंघोषित रीलस्टार संतोष पंडित याच्याविरोधात पुण्यातील पर्वती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पत्रकाराशी अर्वाच्च्य भाषा वापरणे, कपड्यांवरून अश्लिल टिप्पणी करणे तसेच तिच्या इच्छेविरुद्ध मोबाईलमध्ये चित्रीकरण केल्यामुळे त्याच्याविरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला.

नाशिक येथील अशोक खरात प्रकरणाचा निषेध करण्यासाठी टिळक रस्त्यावरील सर्व महाविद्यालयांजवळ आंदोलन ठेवण्यात आले होते. संबंधित महिला पत्रकार आंदोलनाचे कव्हरेज करण्यासाठी त्या ठिकाणी गेल्या होत्या. याचवेळी संतोष पंडित घटनास्थळी आला आणि पत्रकारांवर संताप व्यक्त करत अर्वाच्च्य भाषेत बोलू लागला. त्याने या महिला पत्रकाराच्या अंगावरील कपड्यांवरून अश्लिल टिप्पणी केली. तिच्या इच्छेविरुद्ध मोबाईलद्वारे चित्रीकरण केल्याचेही समोर आले आहे. याप्रकरणी संबंधित महिला पत्रकाराने दिलेल्या तक्रारीवरून अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस निरीक्षक सुभाष महाले करत असून, पुढील चौकशी सुरू आहे.

### भोंदू अशोक खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**जनप्रवास । प्रतिनिधी**

नाशिक : राज्यभरात खळबळ उडवून दिलेला नाशिकमधील भोंदू बाबा अशोक खरात गेल्या दोन आठवड्यांपासून पोलीस कोठडीत होता. त्याच्या पोलीस कोठडीची मुदत आज (बुधवार) संपत असल्याने त्याला नाशिकच्या सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने या प्रकरणातील गांभीर्य लक्षात घेत अशोक खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. या प्रकरणाची व्याप्ती आणि चर्चा पाहता, प्रचंड पोलिस बंदोबस्तात खरातला कोर्टात आणण्यात आले आणि अवघ्या पाच मिनिटांत सुनावणी होऊन त्याला कोर्टाबाहेर नेण्यात आले.

न्यायाधीश श्रीमती बी. इन. ईचपुरानी यांच्या कोर्टात अशोक खरातला हजर करण्यात आले. तपास अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी कोर्टरूममध्ये दाखल झाले. सरकारी वकील शैलेंद्र बागडेही हजर झाले. आधी सरकारी वकीलांच्या युक्तीवादाला सुरूवात झाली. न्यायाधीशांनी काही कागदपत्रे तपासली आणि तपास अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. त्यानंतर अवघ्या ५ मिनिटांत अशोक खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.

# गॅस टँकरमधून अवैध गॅस भरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## ४९ लाखांचा मुद्देमाल जप्त, चाकण पोलिसांची मोठी कारवाई

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : चाकण परिसरात घरगुती गॅसची टंचाई जाणवत असतानाच या परिस्थितीचा गैरफायदा घेत लोकांच्या जीविताशी खेळणाऱ्या टोळीचा चाकण उत्तर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पहाटेच्या सुमारास टाकलेल्या धाडीत अवैधरित्या गॅस रिफिलिंग करणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली असून तब्बल ४९ लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चाकण उत्तर पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत भोसे (ता.खेड) गावच्या हद्दीत गॅस टँकरमधून अवैधपणे गॅस भरण्याचे काम सुरू असल्याची माहिती मिळाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पोलीस पथक तयार करण्यात आले. (दि.३१) रोजी पहाटे सुमारे ४:४० वाजता चाकण–शिक्रापूर रोडवरील इंडेन कंपनीच्या पार्किंगमध्ये



पोलिसांनी छापा टाकला. यावेळी या गॅस टँकरचे आउटलेट सील तोडून कोणत्याही सुरक्षा उपाययोजनांशिवाय घरगुती गॅस सिलिंडरमध्ये गॅस भरला जात असल्याचे उघड झाले. अत्यंत धोकादायक पद्धतीने सुरू असलेल्या या प्रकारामुळे मोठा अपघात घडण्याची शक्यता होती.

या कारवाईत पोलिसांनी अंबादास रोहिदास गाडे (वय ४२, रा. चेंबूर, मुंबई), अक्षय रमेश मुंगसे (वय २५, रा. रासे, ता. खेड) आणि नवनाथ अंकुश होजगे (वय ३४, रा. भोस, ता. खेड) यांना अटक केली.

# पुण्यात दहा वर्षानंतरही काम अपूर्णच

**जनप्रवास । प्रतिनिधी**



**योजना पूर्ण नाही, पण पाणीपट्टी मात्र दुप्पट का?**

पुणे : शहरातील पाणीगळती रोखणे आणि सर्व भागांना समान पाणी वाटप करण्याच्या उद्देशाने २०१६ मध्ये सुरू करण्यात आलेली समान पाणीपुरवठा योजना तब्बल १० वर्षानंतरही अपूर्णच असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे या योजनेला मंजुरी देताना पहिल्याच वर्षी पाणीपट्टीत २० टक्के वाढ, तर पुढील चार वर्षे दरवर्षी १५ टक्के वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार पुणे महापालिकेने आजपर्यंत एकूण ८० टक्क्यांहून अधिक वाढ केली असून पुणेकरांवर अतिरिक्त आर्थिक भार पडला आहे.

पुणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने मे २०१५ मध्ये २,८१८ कोटी रुपयांच्या या योजनेला मंजुरी दिली होती. निविदा प्रक्रिया वादात सापडल्याने फेरनिविदा मागवाव्या लागल्या, मात्र त्यातून पालिकेचे सुमारे १,००० कोटी रुपये वाचले, असा दावा करण्यात आला होता. त्यानंतर २०१६ मध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली.

या योजनेअंतर्गत शहरात उभारण्यात येणाऱ्या ८२ पैकी १५ पाण्याच्या टाक्यांचे काम अद्याप अपूर्ण आहे. कोरोना काळातील ठप्प कामे, वाहतूक पोलिस, पाटबंधारे विभाग, रेल्वे, लष्कर आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या परवानग्यांमुळे कामाला मोठा विलंब झाल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात आहे. आतापर्यंत या योजनेवर १,५५७ कोटी रुपये खर्च झाले असून काम केवळ ८५ टक्के पूर्ण झाले आहे. पूर्णत्वासाठी अजून १४ महिन्यांचा कालावधी लागणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

पालिका प्रशासनाच्या मते, योजना पूर्ण कार्यान्वित झाल्यानंतर पाण्याची गळती २० टक्क्यांनी कमी होऊन ३ ते ४ टीएमसी पाण्याची बचत होणार आहे. मात्र तोपर्यंत पुणेकरांना वाढीव पाणीपट्टी भरावी लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

# पीएमपी बसमध्ये प्रवासी महिलेच्या पिशवीतून ६.९० लाखांचे दागिने लंपास

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : पीएमपी प्रवासी महिलेच्या पिशवीतून सहा लाख ९० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लांबविण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी एका महिलेविरोधात वानवडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका महिलेने फिर्याद दिली आहे. तक्रारदार ५४ वर्षीय महिला मूळच्या धाराशिव जिल्ह्यातील उमरगा शहरातील रहिवासी आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला हडपसर गाडीतळ ते चिंचवड या मार्गावरील पीएमपी बसमधून ३० मार्च रोजी सकाळी दहाच्या सुमारास प्रवास करत होत्या.

पुणे–सोलापूर रस्त्यावर हडपसमधील वैदुवाडी परिसरात पीएमपी बसमध्ये तक्रारदार महिलेच्या शेजारी थांबलेल्या एका महिलेने उलटी आल्याची बतावणी केली. तक्रारदार महिलेला धक्का दिला. महिलेचे लक्ष नसल्याची संधी साधून पिशवीत ठेवलेले सहा लाख ९० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरट्या महिलेने लांबविले, असे तक्रारदार महिलेने फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस उपनिरीक्षक इनामदार पुढील तपास करत आहेत.

# पिंपरी-चिंचवडमध्ये विक्रमी ९४७ कोटींची करवसुली

## ६.२७ लाख मालमत्ताधारकांनी भरला कर

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पिंपरी : पिंपरी–चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने (२०२५–२६) या आर्थिक वर्षात ९४७ कोटी रुपयांचा कर वसूल केला आहे. ७ लाख ३२ हजार मालमत्ता धारकांपैकी ६ लाख २७ हजार ७९० मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला आहे.

गेल्या वर्षभरापासून थकबाकीदारांच्या मालमत्ता लाखबंद, नळजोड खंडित करणे, वर्दळीचे ठिकाण, मुख्य चौकात मालमत्ता कर भरण्याबाबत जनजागृती करण्यात आली.



त्याला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. ९४७ कोटींचा कर वसूल झाला आहे. निवासी ५ लाख ५२ हजार ४२, बिगरनिवासी ५२ हजार २११, औद्योगिक ४ हजार ७८३, मिश्र १३ हजार ६७४, मोकळ्या जमिनी पाच हजार ४९ आणि इतर ३१ मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला आहे. ऑनलाइन माध्यमातून ७०६ कोटी ७२ लाख, धनादेशाद्वारे ११० कोटी ५२ लाख, रोखीने ८३ कोटी ८८ लाख, डिमांड ड्राफ्टद्वारे ७ कोटी ९ लाख आणि ईडीसी'द्वारे ६ लाख रुपयांचा भरणा झाला आहे

थकीत करवसुलीसाठी महापालिकेने एक मार्चपासून अभय योजना राबविली. या योजनेचा ३१ मार्चपर्यंत ८३ हजार ४७० थकबाकीदारांनी लाभ घेतला आहे. या मालमत्ताधारकांना ४५ कोटी १३ लाख रुपयांची सवलत मिळाली. ३१ दिवसांत १९७ कोटी १८ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल झाला आहे.

शहरात कर संकलनासाठी महापालिकेचे १८ विभाग आहेत. वाकड विभागीय कार्यालयातून सर्वाधिक ११७ कोटी १८ लाख, त्या खालोखाल थेरगाव ९७ कोटी ६१ लाख, चिंचवडमधून ७७ कोटी ३४ लाखांचा कर वसूल झाला आहे. पिंपरीनगर कार्यालयातून सर्वांत कमी आठ कोटी ४२ लाखांचा कर जमा झाला आहे.

# दारूच्या नशेत तरुणांचा हैदोस; धारदार हत्याराने केली नऊ गाड्यांची तोडफोड

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : दारूच्या नशेत असलेल्या चार अल्पवयीन तरुणांनी हातात धारदार हत्यारे घेऊन ८ ते ९ वाहनांची तोडफोड केल्याची घटना मंगळवारी (दि. ३१) रात्री फुरसुंगी परिसरात घडली. याप्रकरणी फुरसुंगी पोलिसांनी चौघांवर गुन्हा दाखल केला असून, यातील एका अल्पवयीन तरुणाला ताब्यात घेतले आहे.

याबाबत एका २५ वर्षीय तरुणाने फिर्याद दिली आहे. अल्पवयीन तरुणांनी दहशतीच्या उद्देशाने रस्त्याच्या कडेला पार्क या वाहनांची तोडफोड केल्याची प्राथमिक शक्यता वर्तवण्यात येत आहे. मंगळवारी (दि. ३१) रात्री पावणेदहाच्या सुमारास पापडे वस्तीतील क्रांती मित्र मंडळ गणेश मंदिर आणि संजुदा कॉम्प्लेक्स परिसरात ही घटना घडली. दारूच्या नशेत असलेल्या या मुलांनी हातात शस्त्रे नाचवत परिसरात दहशत निर्माण केली. त्यांनी रस्त्यावर उभ्या असलेल्या ३ रिक्षा, २ टेम्पो आणि ४ चारचाकी गाड्या, अशा एकूण ९ वाहनांच्या काचा व खोपडी फोडून नुकसान केले.

अचानक झालेल्या या हल्लूयामुळे परिसरात घबराट पसरली होती. घटनेची माहिती मिळताच फुरसुंगी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अमोल मोरे यांच्यासह पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

# दिलेला शब्द पूर्ण; साकळाई सिंचन योजनेला अखेर मंजुरी : डॉ. सुजय विखे पाटील

## १२३४.१३ कोटी खर्च करून चार वर्षात योजना पूर्ण करणार; ९६०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार

**जनप्रवास प्रतिनिधी**

अहिल्यानगर : जिल्ह्यातील श्रीगोंदा व नगर तालुक्यातील ३२ दुष्काळग्रस्त गावांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणारी साकळाई उपसा सिंचन योजना अखेर मंजूर झाली आहे. अनेक दशकांपासून चर्चेत असलेल्या या योजनेला राज्य मंत्रिमंडळाने अंतिम मान्यता दिल्याने परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या योजनेसाठी एकूण १,२३४.१३ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून पुढील चार वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून सुमारे ९,६०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असून ३२ गावांच्या शेतीला मोठा दिलासा मिळणार आहे.

ही योजना दीर्घकाळापासून राजकीय चर्चेचा विषय ठरली होती. अनेक निवडणुकांमध्ये या योजनेची आश्वासने देण्यात आली, मात्र प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नव्हती. १६ एप्रिल २०१९ रोजी वाळकी येथे झालेल्या जाहीर सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेला मंजुरी देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

सध्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा मंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर या योजनेला गती दिली. त्यांच्या प्रयत्नांमुळे १ एप्रिल रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रकल्पाला अंतिम मान्यता मिळाली.

या योजनेअंतर्गत म्हैसगाव येथून चार टप्प्यांत पाणी उपसा करून श्रीगोंदा व नगर तालुक्यातील गावांना पुरवठा केला जाणार आहे. यासाठी चार पंपगृह व तीन वितरण यंत्रणा



उभारण्यात येणार असून सुमारे २०८.३४ मीटर उंचीवर पाणी उचलून चिखली व घुटेवाडी परिसरातील डोंगरावरील वितरण हौदात सोडले जाणार आहे.

या प्रकल्पाच्या माध्यमातून लघू पाझर तलाव, सिमेंट नाला बंधारे तसेच गाव तलावांचे पुनर्भरण करण्यात येणार आहे. एकूण १.६० टीएमसी पाणी सिंचनासाठी तर ०.२० टीएमसी पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. खरीप हंगामात १५ जुलै ते १५ ऑक्टोबर या कालावधीत जलसाठ्यांचे पुनर्भरण केले जाणार आहे.प्रकल्पासाठी एकूण ३९.७१ हेक्टर क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी ३०.२२ हेक्टर खाजगी जमीन संपादित करण्यात येणार आहे. सगाव येथे पहिल्या टप्प्यात पंपगृह उभारण्यात येणार असून उर्वरित कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जाणार आहेत.या संदर्भात भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले की, साकळाई योजना पूर्ण करण्याचा दिलेला शब्द आम्ही पाळला आहे. पुढील चार वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करून शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवू.

तसेच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुमित्रा पवार तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.डॉ. सुजय विखे पाटील यांनी अनेक सभांमध्ये ही योजना पूर्ण करणार असू, तर आम्हीच ती पूर्ण करू, असे ठामपणे सांगितले होते. अखेर त्या शब्दाला न्याय देत या योजनेला मंजुरी मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.या योजनेच्या मंजुरीमध्ये जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी आमदार बबनराव पाचपुते, आमदार विक्रमसिंह पाचपुते तसेच स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या मार्गदर्शनाचा महत्त्वाचा वाटा असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. या प्रकल्पामुळे दीर्घकाळ दुष्काळाचा सामना करणाऱ्या भागाला मोठा दिलासा मिळणार असून शेती उत्पादन, पिण्याचे पाणी व ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अग्रलेख : पाच राज्यांच्या निवडणुका; लोकसभेची सेमीफायनल

भारताच्या राजकीय पटावर २०२६ हे वर्ष अत्यंत निर्णायक मानले जात आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये केवळ प्रादेशिक सत्तांतराचा प्रश्न नसून देशाच्या व्यापक राजकीय प्रवाहाचे दिशानिर्देश ठरवणाऱ्या आहेत. लोकसभा निवडणुकांनंतर पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनमताची चाचणी होणार असल्याने या निवडणुकांकडे 'सेमीफायनल' म्हणूनही पाहिले जात आहे. ही निवडणूक सुमारे १७ कोटींपेक्षा अधिक मतदारांना स्पर्श करणारी असून ८०० हून अधिक विधानसभा मतदारसंघांमध्ये आहे. एकूणच भारतीय राजकीय पटलावर ही केवळ प्रादेशिक सत्ताबदलाचे प्रकरण नसून राष्ट्रीय राजकारणाच्या भविष्याची दिशा ठरवणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. अर्थात पुढील लोकसभेची सेमीफायनल ठरणार आहे.

पश्चिम बंगालमध्ये पुन्हा एकदा ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष यांच्यात थेट लढत पाहायला मिळणार आहे. २०२१च्या विधानसभा निवडणुकीत टीएमसीने २१३ जागा जिंकून आपले वर्चस्व कायम राखले होते, तर भाजपने ७७ जागा जिंकून मुख्य विरोधी पक्षाची भूमिका स्वीकारली होती. २०२१ मध्ये भाजपने मोठी झेप घेतली होती, परंतु सत्ता हस्तगत करण्यात अपयश आले. यावेळी भाजप संघटनात्मक ताकद, केंद्रातील सत्ता आणि राष्ट्रवादाचा मुद्दा घेऊन मैदानात उतरत आहे, तर तृणमूल स्थानिक ओळख, कल्याणकारी योजना आणि ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वावर भर देत आहे. ममता बनर्जींच्या नेतृत्वाखालील टीएमसीची राजकीय रणनीती मुळात बंगाली अस्मितेवर आधारित आहे. भाजपच्या बाजूने सुवेंदु अधिकारी यांचे नेतृत्व महत्त्वाचे ठरले आहे. त्यांच्याकडे टीएमसीच्या कार्यपध्दती विरुध्द भ्रष्टाचार, तुष्टीकरणाचे आरोप, सीमाभागातील सुरक्षा, बांगलादेशातून होणारी घुसखोरी, अल्पसंख्यांक मतांचे ध्रुवीकरण हेही निवडणुकीचे निर्णायक घटक ठरू शकतात.

तमिळनाडूमध्ये द्रविडीयन राजकारणाचा प्रभाव अजूनही कायम आहे. येथे द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांच्यातील पारंपरिक संघर्ष आहे, मात्र भाजप आता स्वतंत्र राजकीय शक्ती म्हणून उभे राहण्याचा प्रयत्न करत आहे. द्रमुक सत्तेत असल्यामुळे कल्याणकारी योजनांवर आणि सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांवर भर देत आहे, तर विरोधक भ्रष्टाचार, बेरोजगारी व प्रशासनातील त्रुटींचा मुद्दा उचलत आहेत. डीएमके, एआयएडीएमके या दोन मुख्य द्रविडीयन पक्षांच्या आलटून पालटून राज्य करण्याच्या शर्यतीत आता अभिनेता विजयच्या तमिलगा वेत्री कझगमचा (टीव्हीके) नवा घटक जोडला गेला आहे. एम. के. स्टालिनच्या नेतृत्वाखालील डीएमकेची सध्याची सत्ता मजबूत आहे. डीएमकेची धोरणे मुख्यत्वे सामाजिक न्यायावर आधारित आहेत आणि त्यांनी मोफत रेशन, मोफत बससेवा, निवृत्तीधारकांना आर्थिक सहाय्य अशा लोकप्रिय योजना राबवल्या आहेत. केंद्राशी असलेले संबंध आणि इंडिया आघाडीतील सहभाग या त्यांच्या राजकीय ताकदीचे महत्त्वाचे घटक आहेत. एआयएडीएमकेच्या बाबतीत जे. जयललिता यांच्या निधनानंतर पक्षाची स्थिती अत्यंत नाजूक झाली आहे. केरळमध्ये परंपरेप्रमाणे एलडीएफ आणि यूडीएफ यांच्यात सरळ संघर्ष आहे. येथे भाजप अजूनही तिसऱ्या क्रमांकावर असला तरी ती आपली उपस्थिती वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. अलीकडील काही नेत्यांच्या पक्षांतरामुळे राजकीय समीकरणांमध्ये थोडेफार बदल दिसून येत आहेत. केरळमधील मुख्य प्रश्नांमध्ये आर्थिक संकट, बेरोजगारी, परदेशी रोजगारावर अवलंबित्व, तसेच शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थेतील सुधारणा यांचा समावेश आहे. धार्मिक ध्रुवीकरणाचा मुद्दाही येथे हळूहळू महत्त्वाचा होत आहे. केरळच्या राजकारणात पारंपरिकपणे युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट (यूडीएफ) आणि लेफ्ट डेमोक्रॅटिक फ्रंट (एलडीएफ) यांच्यात राजकीय स्पर्धा असते. तथापि, केरळमध्ये भाजपची वाढ मर्यादित आहे. कारण राज्यातील मतदारांची धर्मनिरपेक्ष, प्रगतिशील विचारसरणी आहे.

आसाममध्ये भाजपची सत्ता आहे आणि मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली पक्ष पुन्हा सत्तेत येण्याचा प्रयत्न करीत आहे. नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए), राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी), स्थलांतर, तसेच प्रादेशिक अस्मिता हे येथील प्रमुख मुद्दे आहेत. काँग्रेस आणि प्रादेशिक पक्ष एकत्र येऊन भाजपला आव्हान देण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु त्यांची एकजूट कितपत प्रभावी ठरेल, हा प्रश्न आहे. आसाममध्ये भारतीय जनता पक्षाचे वर्चस्व असल्याचे स्पष्ट आहे. तरीही ही निवडणूक त्यांची सत्वपरीक्षा पाहणारी आहे.

पुद्दुचेरीसारख्या लहान केंद्रशासित प्रदेशातही राजकीय स्पर्धा तीव्र आहे. येथे स्थानिक नेतृत्व, आघाड्या आणि लहान पक्षांचे समीकरण निर्णायक ठरते. अलीकडील उमेदवार घोषणांमुळे आणि आघाड्यांतील बदलांमुळे येथील राजकारण अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. पुद्दुचेरीच्या ३० सदस्यीय विधानसभेचे राजकारण अत्यंत गुंतागुंतीचे आहे. सध्या एन. रंगास्वामी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार आहे. रंगास्वामी हे अखिल भारतीय एन. आर. काँग्रेसचे नेते आहेत आणि भाजपच्या पाठिंब्याने सत्तेत आहेत. विरोधी पक्षांमध्ये द्रविड मुनेत्र कझगम (डीएमके), काँग्रेस आणि इतर क्षेत्रीय पक्षांचा समावेश आहे. पुद्दुचेरीचे राजकारण तमिळनाडूच्या राजकारणाशी जवळचे संबंधित आहे आणि द्रविडीयन राजकारणाचा प्रभाव इथेही दिसून येतो. या पाच राज्यांतील निवडणुकांमध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रादेशिक पक्ष विरुद्ध राष्ट्रीय पक्ष असा संघर्ष. भाजप देशभर विस्तार करण्याच्या धोरणावर ठाम आहे. बंगाल, तमिळनाडू आणि केरळसारख्या राज्यांमध्ये आपली पकड मजबूत करणे हे भाजपचे मोठे उद्दिष्ट आहे. दुसरीकडे काँग्रेससाठी ही निवडणूक अस्तित्वाची लढाई आहे. त्यामुळे प्रादेशिक पक्षांसोबत आघाडी करून भाजपविरोधी मतांचे एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न काँग्रेस करत आहे. एकूणच ही निवडणूक आगामी लोकसभेची सेमीफायनल ठरणार आहे.

# राष्ट्रवादी विलिनीकरणास आधी नकार; नंतर होकार

**राजधानीतून**

## सुनील तटकरे यांच्या वेगवेगळ्या भूमिकेमुळे पुन्हा वादंग





स्व. अजितदादा पवार यांच्या पश्चात वादग्रस्त बनलेल्या दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबाबत सर्व पुरावे समोर आल्यानंतरही प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह त्यांच्या काही नेत्यांनी नकार दिला होता. आता मात्र तटकरे यांनीच घूमजाव करीत विलिनीकरणाची चर्चा झाली होती असे सांगत कबूल केल्याने नवे वादंग निर्माण झाले आहे. मुळात आता हा विषय कबूल करून सुनील तटकरेंना काय साध्य करायचं आहे, असा सवाल शरद पवार राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केला.

एका वृत्तवाहिनीच्या विशेष कार्यक्रमात सुनील तटकरे राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत आपल्याला आधीपासून माहिती होती आणि त्याला विरोध नव्हता, असे तटकरे यांनी स्पष्ट कबूल केले. ते म्हणाले, अजितदादांच्या अंत्यसंस्काराच्या दिवशीच काही नेत्यांनी मुलाखती दिल्या की अजितदादांची दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची अंतिम इच्छा होती. त्यादृष्टीने त्यांच्या हयातीतच विलीनीकरण अंतिम टप्प्यात आलं होतं. या तारखेला विलिनीकरण होणार होतं, आणखी एक सो कॉल्ड व्हिडिओ, दादा त्या बैठकीला बसलेत आणि ते सगळे असं झालं. सलग दोन दिवस त्या मुलाखती सुरु राहिल्या. मी त्या वेळी बोलण्याच्या मानसिकतेत नव्हतो. बोललो असतो तर अश्रूंचा बांध आवरला नसता. ज्या पध्दतीनं ते सुरु झालं त्याचा अर्थ राजकीय अर्थ लक्षात आला की काही तरी चुकीचं घडतंय. मात्र माझा काही विलिनीकरणाला विरोध नव्हता असं म्हणत घुमजाव केले. आता विलिनीकरणाचा विषय कशासाठी? यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्यांकडून तटकरेंवर हल्लाबोल केला जात आहे. अशातच शशिकांत शिंदे यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे.

**मुळात आता का चर्चा करत आहेत?**

शशिकांत शिंदे यांनी म्हटलंय की, आधी कोणी तरी बोलत होतं की, अजित पवार यांनी आमच्याशी कधीच चर्चा केली नाही. आता मात्र म्हणत आहेत की, चर्चा झाली होती. अजित पवारांनी विलीनीकरण करण्याबाबत चर्चा केली होती. मुळात आता का चर्चा करत आहेत कारण आम्ही आता महाविकास आघाडी म्हणून पुढे गेलो आहोत. आता विलीनीकरण चर्चा नाही कार्यकर्ते उगाच डिस्टर्ब होतात. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाचा विषय नाही कारण विलीनीकरण चर्चा अजित पवार यांच्यासोबत झाली होती. अजित पवारांना माहिती होतं की आगामी काळात मित्र पक्षांसोबत भाजप कसं वागणार आहे. तुम्ही सातारा उदाहरण पाहिलं की कशा प्रकारे भाजपने सत्ता हातात घेतली. त्यामुळे अजित पवार एकत्रीकरणासाठी आग्रही होते, असंही शशिकांत शिंदेंनी म्हटलं आहे.

**विलीनीकरण माझ्या हातातील विषय नाही**


विलीनीकरण होणे हीच अजित पवारांना खरी श्रद्धांजली ठरेल असं तुम्ही म्हणत होतात आता काय अडचण आहे? ते एक पाऊल पुढे टाकत आहेत तुम्ही का टाकत नाही? या प्रश्नावर उत्तर देताना शशिकांत शिंदे म्हणाले की, 'तुम्ही मला खोदून खोदून विचारत आहात मात्र विलीनीकरण ही चर्चा माध्यमातून होतं नाही.' तुम्हाला प्रस्ताव आला तर विचार होईल की कायम स्वरुपी बाय बाय केलं? यावर उत्तर देताना शिंदे म्हणाले, जर तरचा विषय नाही. विलीनीकरण चर्चा हा माझ्या हातातील विषय नाही. आमचे सर्व वरिष्ठ एकत्रित बसून निर्णय घेत असतात. शरद पवार आमच नेतृत्व आहेत. आम्ही महाविकास आघाडीत आहोत आणि कामाला सुरुवात देखील केली आहे. शरद पवार देखील लवकरच महाराष्ट्र दौरा करणार आहेत.

### काय म्हणाले सुनील तटकरे?

अजितदादांच्या मृतदेहाच्या साक्षीनेच काहीजणांनी दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा सुरू केली होती. मी त्या वेळी बोलण्याच्या मानसिकतेत नव्हतो. बोललो असतो तर अश्रूंचा बांध आवरला नसता. ज्या पध्दतीनं ते सुरु झालं ते चुकीच्या पद्धतीने आणि पक्ष हायजॅक करण्याच्यादृष्टीने होतं. माझा काही त्याला विरोध होता असा भाग नाही. पण पण दादा असताना विलिनीकरण आणि दादा नसताना विलिनीकरण खूप फरक आहे ना. शिवाय विलिनीकरण करू, सुनेत्रावहिनींना पक्षाचा अध्यक्ष निवडा असे कुणी का म्हटले नाही?

# अंतरंग

## शक्तीचे द्योतक महाबली हनुमान...!



**जय हनुमान ज्ञान गुन सागर।**
**जय कपीस तिहुं लोक उजागर।।**
**रामदूत अतुलित बल धामा।**
**अंजनि-पुत्र पवनसुत नामा।**

हनुमान चालीसा स्तोत्राच्या या ओळी पठण करायला लागल्यावर एक प्रकारचा उत्साह, ऊर्जा, सकारात्मकता संचारते. सप्तचिरंजिवांपैकी एक असलेले हनुमंत शक्ती आणि बुध्दी यांचा अद्भुत संगम मानले जातात. हनुमंतांनी शक्तीची जेवढी कामे केली, तेवढीच युक्ती, चातुर्य आणि विवेक वापरल्याच्या अनेक घटना, प्रसंग आपल्याला दाखवता येतात. काही मान्यतांनुसार हनुमानाची भक्ती, उपासना, नामस्मरण ही तुलनेने जलद फलप्राप्ती देणारी आहे.

आताच्या कलियुगात हनुमानाची आराधना, उपासना, नामस्मरण करणे अत्यंत शुभ व लाभदायक असल्याचे सांगितले जाते. शनिवारी करण्यात येणारे हनुमानाचे पूजन विशेष महत्त्वाचे मानले जाते. हनुमानाचे पूजन केल्याने अनेक समस्या, अडचणी, अडथळे दूर होतात. तसेच शनीची ढिय्या दशा, साडेसाती यांचा प्रतिकूल प्रभाव कमी होण्यास मदत मिळते, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते. रामायणात हनुमानाची वेगवेगळे स्वरुप आपल्याला पाहायला मिळते. रामभक्त हनुमानाच्या विविध स्वरुपांच्या मूर्ती, प्रतिमा, तसबिरी यांचे पूजन केले जाते. काही शास्त्रांनुसार, हनुमानाच्या अनेकविध स्वरुपांचे पूजन केल्याचे विविध लाभ, फायदे, शुभ परिणाम आपल्याला प्राप्त होऊ शकतात, असे सांगितले जाते. हनुमंतांचे नेमक्या कोणत्या स्वरुपाचे पूजन करणे लाभदायक मानले जाते?

**भक्त हनुमान** – प्रभो, मज एकच वर द्यावा । या चरणांच्या ठायीं माझा निश्चल भाव रहावा ।।, असे वरदान हनुमान श्रीरामांकडे मागताना आपल्याला दिसतात. जोवर हे जग, हे पृथ्वी, ही सृष्टी अस्तित्वात आहे, तोपर्यंत श्रीरामांचे नाव घेत राहण्याची हनुमंतांची इच्छा ही सर्वश्रेष्ठ आणि सर्वोत्तम रामभक्त असल्याची प्रचिती आपल्याला देत. रामभक्त हनुमंतांच्या या स्वरुपाचे पूजन करणे लाभदायक मानले गेले आहे. या स्वरुपात हनुमान नेहमी रामनामात तल्लीन असलेले पाहायला मिळतात. हनुमंतांच्या या स्वरुपाचे पूजन केल्यास हाती घेतलेल्या कामात यश मिळून प्रगतीचे मार्ग प्रशस्त होतात. एकाग्रता क्षमता वाढीस लागते. नियोजित ध्येय प्राप्त करण्यात येत असणाऱ्या अडचणी, समस्या दूर होतात, अशी मान्यता आहे.

**सेवक हनुमान** – विद्यावान गुणी अति चातुर, राम काज करिबे को आतुर, यावरून रामकार्य करण्यासाठी हनुमंत तत्पर असल्याचे पाहायला मिळते. श्रीराम भेटीपासून ते अवतारकार्याची सांगता करेपर्यंत हनुमंत सदैव रामकार्यात गुंग असलेले आपल्याला दिसतात. आपल्या आराध्यासाठी ते कोणत्याही परिस्थितीला सामोरे जातात. रामकार्यात स्वतःला झोकुन दिलेल्या हनुमानाच्या सेवक हनुमान स्वरुपाचे पूजन उत्तम मानले गेले आहे. हनुमानाच्या या स्वरुपाचे पूजन केल्यास भाविकाच्या मनात काम आणि नातेसंबंधांप्रति समर्पणाची भावना निर्माण होते. काम करण्याचा उत्साह द्विगुणित होतो. अशा व्यक्तींना कौटुंबिक आणि कार्यक्षेत्र या दोन्ही आघाड्यांवर विशेष स्नेह प्राप्त होतो. मान, सन्मान प्राप्त होतात, असे सांगितले जाते.

**वीर हनुमान** – रामभक्त हनुमंतांचे केवळ नाव घेतले किंवा त्यांचे कोणतेही स्वरुप डोळ्यासमोर आणले, तरी त्यांचा पराक्रमच प्रथम आपल्याला पाहायला मिळतो. हनुमंतांनी राम कार्य तडीस नेण्यासाठी अतुल पराक्रम गाजवल्याचे आपल्याला अनेक प्रसंगांतून पाहायला मिळते. हनुमंतांनी रामकार्य करताना अनेक राक्षसांना धडा शिकवला. लंकादहन केले. लक्ष्मणांसाठी हिमालयात जाऊन संजीवनी बुटी आणली, असे अनेक दाखले वीर हनुमान रुपाचे देता येतील. हनुमंतांच्या वीर हनुमान स्वरुपाचे पूजन केल्याने आत्मविश्वास, साहस, पराक्रम यांच्यात वाढ होते, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते.

**सूर्यमुखी हनुमान** – सूर्यदेव हनुमंतांचे गुरु असल्याचे सांगितले जाते. सूर्योदयाची दिशा ही पूर्व आहे. सूर्य आणि सूर्याचा प्रकाश गती आणि ज्ञानाचे प्रतीक मानले गेले आहे. सूर्याकडे पाहणाऱ्या हनुमानाची तसबीर स्थापन करून त्याचे पूजन करणे अत्यंत शुभ फलदायी मानले गेले आहे. असे केल्याने भक्तांना ज्ञानप्राप्ती होते. तसेच हाती घेतलेल्या कामातील समस्या, अडचणी दूर होऊन कार्यांत गती प्राप्त होते. सूर्यमुखी हनुमंतांचे पूजन विद्या, प्रसिद्धी, मान-सन्मान, प्रगतीकारक मानले गेले आहे, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते.

**दक्षिणमुखी हनुमान** – दक्षिण दिशेला मुख असलेल्या हनुमानाच्या मूर्तीला दक्षिणामुखी हनुमान असे म्हटले जाते. दक्षिण दिशा काल म्हणजेच यम देवतेची मानली गेली आहे. हनुमान रुद्राचे म्हणजेच महादेव शिवशंकरांचा अवतार असल्याची मान्यता आहे. त्यामुळे दक्षिणामुखी हनुमानाचे पूजन मृत्यूचे भय आणि चिंता, समस्या यांचे निराकरण करणारे ठरते, असे सांगितले जाते. तसेच उत्तरामुखी हनुमानाची पूजाही लाभदायक मानली गेली आहे. उत्तर दिशा देवतांची दिशा मानली गेली आहे. उत्तरामुखी हनुमानाचे पूजन केल्याने सर्व देवतांचे शुभाशिर्वाद प्राप्त होऊ शकतात, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते.

**– रामकृष्ण जोशी**

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ चैत्रशके संवत्- १९४८
संवत्सर -पराभवनाम अयन- उत्तरायणारंभ मास- चैत्र
ऋतु- सौर वसंत शुक्ल पक्ष तिथि : पूर्णिमा ०७:४१:४३
नक्षत्र : हस्त १७:३८:२६ योग : ध्रुव १४:१९:०८ करण:बव
०७:४१:४३ करण : बालव २०:०८:५७ सूर्य : मीन चन्द्र : कन्या हिजरी
सन् - १४४५ मुस्लिम मास - शव्वालतारीख - १३ विशेष हनुमान जन्मोत्सव
वैशखस्नानारंभ चैत्र पौर्णिमा आयबील ओळी समाप्ती (जैन) छत्रपती शिवाजी महाराज
पुण्यतिथी (तिथीप्रमाणे) महालक्ष्मी रथोत्सव - केळशी शितलादेवी यात्रा - केळवे
(ठाणे) कालभैरव यात्रा- चांदवड (नाशिक) पौर्णिमा समाप्ती सकाळी ७.४१

## राशी भविष्य...

**मेष** – आर्थिक लाभ होईल. आपल्या कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. आरोग्याची काळजी घ्या. घरात सुख-शांती, व आनंद राहील. धैर्य आणि सहनशीलता राखा.

**वृषभ** – नवीन कार्य हाती घ्याल, बिघडलेले संबंध चांगले होवून प्रसन्नता वाटेल. अभ्यासाची आवड लागेल. तोंडावर नियंत्रण ठेवा. कामकाजात वाढ होईल, परंतु कामाचे योग्य फळ पदरात पडेल.

**मिथून** – मन लावून काम केल्यास धंद्यात वाढ होईल. घाईगडबडीने कामे करू नका. कौटुंबिक परिवाराच्या सहकार्याने समाधान मिळेल. धनलाभ होण्याची शक्यता.

**कर्क** – मित्रांच्या सहकार्यामुळे मनोर्धर्य वाढेल. प्रसन्नता वाटेल, आर्थिक लाभाची शक्यता महत्वाच्या कामांसाठी खर्च होईल. दुसऱ्यांवर विसंबून राहू नका.

**सिंह** – पूर्वी केलेल्या कामाचे फळ मिळेल. लाभ, मान-सन्मानामध्ये वाढ होईल. मनोरंजनाची वेळ येईल. धंद्यात वाढ होईल. खाण्यापिण्यावर लक्ष ठेवा.

**कन्या** – आज आपल्या मनातील इच्छेनुसार कामे पूर्ण होतील. आपले विरोधक ही आपल्या कामाची प्रशंसा करतील. खर्च वाढवू नका. मन लावून काम केल्यास आपल्या कामात वाढ होईल.

**तूळ** – धंद्यात वाद-विवाद होऊ शकतात. कामकाजात व्यत्यय येईल. आवक पेक्षा जावक जास्त असल्याने परेशानी होईल. कौटुंबिक परिवारातील सदस्यांची चिंता वाटेल.

**वृश्चिक** – मनोबल वाढेल. धंद्यात वाढ व सुख-समृध्दी मिळेल. परिवारात केलेल्या कामावर चर्चा होईल. खर्चावर नियंत्रण ठेवा. मोठ्यांचा मान ठेवाल.

**धनू** – योजना पूर्ण झाल्याशिवाय काम हाती घेऊ नका. दुसऱ्याच्या विश्वासावर स्वत:चा काम करावे लागेल. आर्थिक अडचणी, कौटुंबिक सुख मिळेल.

**मकर** – व्यक्तिगत जीवनातील चिंता दूर होतील. व्यवसायात वाढ होऊन आनंद मिळेल. वाहन हळू चालवा. कष्टाला यश मिळेल. कामातील अडचणी दूर होण्याचे योग आहेत.

**कुंभ** – आर्थिक परिस्थिती चांगली राहील. सामाजिक कार्यात व्यापून जाल, धंद्यात नवीन योजना हाती घ्याल, मुलांच्या रोजगाराची चिंता राहील. उद्योग-धंद्यात निष्काजीपणा, उतावळेपणा करू नका.

**मीन** – सामाजिक कार्यात मग्न रहाल. वाहन सुख मिळेल. वेळेचा उपयोग होईल. नोकरीमध्ये केलेल्या कामाचे किंमत, महत्त्व वाढेल. जबाबदारीचे काम टाळा.

# पारावरचा फड

राजकारणात नवनवे विषय आणि पुन्हा त्यातल्या त्यात शिळ्या कडीला पुन्हा ऊत आणून चर्चा घडविणारे प्रकार हे काही नवं नाही. वास्तविक राष्ट्रवादीचे नेते स्व. अजितदादा पवार यांच्या हयातीत सुरू झालेलं दोन्ही राष्ट्रवादी विलिनीकरणाचं प्रकरण राज्यातील गेल्या नगरपालिका निवडणुकीच्या अगोदरपासून सुरू झालं होतं. अर्थात त्यावर त्यांनी अन् काका नेते शरद पवार यांनी वेट अँड वॉच असं सांगितलं. पुढं अजितदादांचं दुर्दैवी निधन आणि त्यातून प्रत्येकानं संधीसाधू वृत्तीनं विलिनीकरणाचं होणं- न होणं यासाठी लचकेतोड केली. आता ते होणं ही अजितदादांची इच्छा होती का, तर आता खुद्द तटकरेही कबूल करू लागलेत. मग पूर्वीचा नकाराचा तमाशा काय होता? दुसरीकडे आता हे कबूल करण्यामागचं कारण काय, हे न उलगडणारं कोडं आहे. एकूणच या राजकीय घडामोडींवर पारावरची चर्चा...!

**बाबूराव :** आरं हे राष्टरवादीच्या इलिनीकनाचं न व्हावं हे नाटक सपलं हुतं न्हवं. मग पुन्यांदा आता रायगडकर तटकरेनी का काडलं उकरून?

**पांडूनाना :** काय न्हाय रं, राजकारनात कदी कदी इशयाला बगल द्याया ते काडावं लागतंया.

**बाबूराव :** म्हजी?

**पांडूनाना :** आता ते खरात परकरन लई तापाय लागलंया न्हवं. त्यात त्या चाकनकरबाई आन् तटकरेच आडचनीत आलं न्हवं. येवडंच काय तर आजितदादाच्या फुटवं फुल्या मारन्यापासनं ते आपघातासाटी म्हनं दादाच्या घराभाईर काळी जादू केली आशी बी चरचा सुरू झाली.

**बाबूराव :** आता डोस्क्यात परकाश पडला. म्हजी त्या रोहित पवार आन् ह्येंच्या आमोल मिटकरीनी दादाच्या आपघाताच्या चौकशीचा भबरा उटीवलाय त्यो पुन्यांदा ह्येंच्याकडं संशयानं याय नगं म्हनून व्हय.

**पांडूनाना :** आता मुद्द्यावं आलास बग.

**बाबूराव :** म्हजी दादाच्या आपघातात काय बाय हाय काय? चौकशी हुनार काय?

**पांडूनाना :** त्येचं फडनवीस सायबानं आदिवेशनात सपिवलं हुतं न्हवं. आनी काय हुनार?

**बाबूराव :** आरं आता त्या तटकरेमागनं त्येची लेक आदितीताई बी आजितदादाच्या आपघाताची चौकशी करावी काडलंया न्हवं.

**पांडूनाना :** ते काडलं खरं, पर मूळ इशय इलीनीकरनाचा हुता आन् आमचा त्येला इरोद न्हाय म्हनत्यात.

**बाबूराव :** मग आता कुनाला हावाय?

**पांडूनाना :** राजकारनात काय हुईल सांगता येत न्हाय.

**बाबूराव :** खराय, न्हायतर भाजपवाल्यास्नी खासदार मिळत्याल. हिकडं पवारसायबास्नी डोळ्यादेकत पक्श आन् नेतं सत्तेत बी जात्याल.

**पांडूनाना :** पर ह्यो ख्योळ जमायाचा काय?

**बाबूराव :** हे काळच ठरवंल...! **– अमृत चौगुले**

# उपदेश कथा

## खोटे नवस

एकदा एक मनुष्य आजारी पडला. सगळ्या वैद्यांनी तो काही आता जगणार नाही असेच सांगितले तेव्हा त्या माणसाने देवाला नवस केला व म्हटले, देवा, मला दुखण्यातून वाचवलंस तर मी तुला हजार पुतळ्या घालीन. हे ऐकून त्याची बायको त्याला म्हणाली, असला अशक्य नवस बोलू नका. आपल्याला ते शक्य होणार नोही. तेव्हा तो म्हणाला, देव कुठे त्या हजार पुतळ्यांसाठी आपल्या दारात येणार आहे. त्याला दुसरे पुष्कळ उद्योग आहेत. पुढे तो मनुष्य खरेच बरा झाला व त्याने पिठाच्या हजार पुतळ्या करून देवाला दिल्या. ते पाहून देव भयंकर चिडला व भुताचे सोंग घेऊन त्या मनुष्याच्या स्वप्नात गेला व म्हणाला, अरे, तू रानात डोंगराच्या पायथ्याशी खणून पाहा, तुला तिथे द्रव्य मिळेल. दुसरे दिवशी तो मनुष्य द्रव्याच्या लोभाने रानात गेला. तेव्हा त्याला रानात चोरांनी पकडले व त्याचे एक न ऐकता गुलाम म्हणून विकून टाकले.

# दिनविशेष...

**आंतरराष्ट्रीय**

०९९९ - गरब्ट याची पहिले फ्रेंच पोपपदी नियुक्ती.
१८६५ - फीडीरल पीकेट याने जनरल ए.पी. हील यांची हत्या केली.
१९८६ - ग्रीस येथे अथेंस विमानतळावर बॉम्बस्फोटात ४ अमेरिकी प्रवासी ठार झाले.
२००७ - प्रशांत महासागरातील सोलोमन या बेटाजवळ झालेल्या तीव्र भूकंपानंतर आलेल्या सुनामीमध्ये ८ जण ठार तर अनेक जण बेपत्ता झाले.
२००७ - पूर्व श्रीलंकेत खचाखच भरलेल्या एका बसमध्ये संशयित तमिळ बंडखोरांनी केलेल्या बॉम्बस्फोटात १५ ठार तर २५ जण जखमी झाले.

**राष्ट्रीय**

१८७० - सार्वजनिक सभेची स्थापना.
१८९४ - राजर्षि शाहूंकडे राज्यकारभाराची सूत्रे.
१९७० - मेघालयाला स्वतंत्र राज्याचा दर्जा.
२००६ - आंध्र प्रदेशात पोलिसांसमवेत झालेल्या चकमकीत ५ माओवादी ठार झाले.
२००६ - आर्थिक वर्षात भारताची निर्यातीने पहिल्यांदा शंभर अब्ज डॉलर्सचा आकडा ओलांडला.
२००८ - भारतीय जनशक्ती पार्टी (भाजश)च्या सहा प्रदेशाध्यक्षांनी एका बैठकीत उमा भारती यांचे नेतृत्व नाकारुन प्रल्हाद पटेल यांची अध्यक्षपदासाठी निवड केली.

## नाशिक विभागात ७५ बिबट्यांचा मृत्यू



काही दिवसापूर्वी बिबट्यांनी नाशिक विभागात धुमाकूळ घातला होता. सध्या मानवी वस्तीतील वावर व हल्ल्याच्या घटना नियंत्रणात आल्या असून बिबटे दिसण्याचे प्रमाण सुध्दा कमी झाले आहे ही बातमी नुकतीच वाचणात आली. नाशिक गेल्या पंधरा महिन्यामध्ये पूर्व विभागाच्या वनविभागाच्या हद्दीत ५० पश्चिम वन विभागाच्या हद्दीत २५ बिबट्यांचा मृत्यू झाला आहे. गेल्यावर्षी बिबट्याच्या हल्ल्यात जिल्ह्यातील नाशिक, सिन्नर, दिंडोरी, चांदवड, या तालुक्यामध्ये माणसाचे बळी गेले आहेत. बळी जाणाऱ्यांमध्ये लहान मुलांचा समावेश मोठ्या प्रमाणात आहे. वनविभागाने तब्बल ३५ पेक्षा जास्त बिबटे कैद करून ठेवले आहेत. जिल्ह्यात रस्ते, रेल्वे, अपघातात तसेच विहरी त कोसळून हे मृत्यू झाले आहेत. अलीकडे महाराष्ट्राच्या काही भागात वारंवार बिबट्याच्या हल्ल्याच्या घटना ऐकावयास मिळतात. मानवाचा अधिवास वाढल्यामुळे त्यांना भक्षासाठी बाहेर पडावे लागल्याने ते उसाच्या शेतात लपून बसतात.

**–स्मिता सानप, नाशिक**

# जन की बात...

## ट्रम्पशाही विरोधात अमेरिकन जनता रस्त्यावर

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हुकूमशाही आणि युद्धखोर वृत्तीने संपूर्ण जग वैतागले आहे. आपल्या हेकेखोरापणामुळे संपूर्ण जगाला युध्दाच्या खाईत लोटणाऱ्या ट्रम्प यांच्यावर जगभरातील जनता वैतागली आहे कारण त्यांनी ज्याप्रकारे इराणवर हल्ला करून संपूर्ण जगाला वेठीस धरले ते कोणालाही आवडले नाही. ट्रम्प यांच्या हुकूमशाही वृत्तीला आता त्यांच्या देशातील जनताही वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने दीड वर्षापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्व शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत. कोणताही विचार न करता इराणवर हल्ला करण्याचा डोनाल्ड ट्रम्प यांच्या आततायी निर्णयाचा निषेध करण्यासाठी अमेरिकेत लाखो लोक रस्त्यांवर उतरले अमेरिकेचा राष्ट्रध्वज उलटा करून नागरिकांनी ट्रम्प यांचा अनोख्या पद्धतीने निषेध केला. या आंदोलनाला आंदोलनकर्त्यांनी नो किंग्ज असे नाव दिले. आम्हाला राजा नको तर लोकशाही मानणारा राष्ट्राध्यक्ष हवा जो लोकशाहिवृत्तीने देशाचा कारभार करेल अशा घोषणा आंदोलनकर्त्यांनी दिले. ट्रम्प यांची छबी विदुषकी रूपात दाखवून डोनाल्ड ट्रम्प चालते व्हा ! अशा घोषणा आंदोलनकर्त्यांनी दिल्या. या आंदोलनात लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वच वयोगटातील लोक रस्त्यावर उतरले होते. या आंदोलनात महिलांची संख्याही लक्षणीय होती. ट्रम्प यांनी कोणताही मागचा पुढचा विचार न करता इराणवर हल्ला केला. खामेनी यांची हत्या करून दोन चार दिवसात इराणवर सहज विजय मिळवू अशा थाटात इराणवर हल्ला करणाऱ्या ट्रम्प यांना महिना उलटून गेला तरी इराणवर विजय मिळवता आला नाही. इराणला शरण आणण्याचे स्वप्न पाहणाऱ्या ट्रम्प यांच्यावरच आता युद्धातून माघार घेण्याची वेळ आली आहे. ट्रम्प यांच्यामुळे संपूर्ण जगात अमेरिकेची नाचक्की होत आहे ही बाब अमेरिकेच्या जनतेला आवडली नाही म्हणूनच ते ट्रम्प यांच्या निषेधार्थ रस्त्यावर उतरत आहेत.

**– श्याम ठाणेदार, पुणे**

## बलोपासनेचे महत्व

छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य स्थापन केले. त्यासाठी त्यांना कणखर आणि निष्ठावान माणसांची आवश्यकता होती. समर्थ रामदास स्वामींनी ही निकड लक्षात घेऊन देशभरात अनेक मठ स्थापन करून हनुमानाच्या मूर्ती समोर बलोपासना सुरू केली. हनुमान हा भक्ती, शक्ती आणि बुद्धीचे परमोच्च प्रतीक मानले गेले आहे. गावागावात फिरून समर्थांनी लहान मुले गोळा केली त्यांच्याकडून रोज हजार सूर्यनमस्कार, दंड-बैठका करून घेत असत. त्याचबरोबर त्यांना धर्मशिक्षण, धर्मरक्षणाचे संस्कारही करत असत. समर्थांच्या एका शिष्याला सूर्यनमस्कार घालण्यास मज्जाव करत धर्मांध फौजदाराने कारागृहात टाकले. समर्थांना ही गोष्ट कळतात समर्थ तिथे गेले आणि हातातील सोट्याने त्या फौजाराला ठोकून काढले आणि आपल्या शिष्याला बाहेर काढले. शिष्याला बाहेर काढल्यावर सर्व उपस्थित शिष्याना ते म्हणाले बलोपासनाने मनगटात बळ येईल पण आपला धर्म, संस्कृती, परंपरा यांना विरोध करणाऱ्यांचा बंदोबस्त करण्याचे सामर्थ मनात असले पाहिजे. हिंसा करणे पाप आहे हेच आपल्याला शिकवले गेले. धर्म, संस्कृती, परंपरा याच्या विरोधात कृती करणाऱ्यांवर केलेली कोणतीही कारवाई हिंसा होऊ शकत नाही ते स्वधर्मपालनच होते आणि हा अधिकार सर्वांना आहे राज्यघटनेने देखील तो दिला आहे.

**–सरीता पाटील, सांगली**

# पाटस पाणीपुरवठा योजनेत ४० कोटींचा 'घोटाळा' संभाजी ब्रिगेडचा भ्रष्टाचाराविरोधात एल्गार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणीपुरवठा योजनेत कोट्यवधी रुपयांचा महाघोटाळा झाल्याचा खळबळजनक आरोप संभाजी ब्रिगेडने केला आहे. ५ कोटींच्या कामासाठी तब्बल ४५ कोटी रुपये लाटले गेल्याचा संशय व्यक्त करत, संभाजी ब्रिगेडच्या वतीने पुणे निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांना धडक निवेदन देण्यात आले. या प्रकरणातील 'पांढरपेशी' अधिकारी आणि ठेकेदारांचे धाबे दणाणले असून उच्चस्तरीय चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे.

संभाजी ब्रिगेडचे पुणे शहराध्यक्ष अविनाश मोहिते पाटील यांनी प्रशासनाचे वाभाडे काढताना या घोटाळ्याची भीषणता मांडली. त्यांच्या दाव्यानुसार ही योजना २०१४-१५ मध्ये सुरू होऊन २०१८ ला पूर्ण झाली. सुरुवातीला खासदार निधीतून ४ कोटी ९९ लाख रुपये खर्च झाले. मात्र, त्यानंतर राज्य शासनाकडून अचानक ४० कोटींचा अतिरिक्त निधी कोणत्या कामासाठी आणला आणि तो कुठे खर्च केला? असा जळजळीत सवाल उपस्थित केला जात आहे. ४० कोटी खर्च करूनही पाटसच्या पाणी साठवणूक किंवा वितरण व्यवस्थेत कोणतीही 'काडीचीही' सुधारणा झालेली नाही. सुमारे ५ कोटी रुपयांची खोटी बिले काढून ठेकेदारांचे खिसे भरले गेल्याचा गंभीर संशय निवेदनात व्यक्त करण्यात आला आहे.



"५ कोटींच्या कामात ४० कोटींची अतिरिक्त भर घालून कोणता विकास साधला? हा केवळ आकड्यांचा खेळ असून यात मोठे मासे अडकण्याची शक्यता आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी झालीच पाहिजे!"
– अविनाश मोहिते पाटील (अध्यक्ष, संभाजी ब्रिगेड पुणे शहर)

सार्वजनिक निधीचा हा अपव्यय म्हणजे जनतेच्या पैशावर मारलेला दरोडाच आहे, अशा शब्दांत संभाजी ब्रिगेडने आपला संताप व्यक्त केला. या प्रकरणात माहिती अधिकारांतर्गत पुरावे गोळा करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, दोषींवर गुन्हे दाखल होईपर्यंत स्वस्थ बसणार नाही, असा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. यावेळी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी निवेदनाचा स्वीकार केला असून, या तक्रारीची दखल घेण्याचे आश्वासन दिले आहे.

या प्रसंगी चंद्रशेखर घाडगे (जिल्हाध्यक्ष, पुणे), निलेश ढगे (सचिव, पुणे) आणि इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आता या ४० कोटींच्या कथित 'पाणी' घोटाळ्यात कोणाकोणाचे हात ओले झाले आहेत, हे चौकशीनंतरच स्पष्ट होईल. मात्र, संभाजी ब्रिगेडच्या या आक्रमक पवित्र्यामुळे दौंड तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

## पाटसमध्ये एमआयडीसीची पाईपलाईन पुन्हा फुटली प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे नागरिकांच्या जिवाला धोका

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** पाटस येथील कारखाना रस्त्यावर असलेली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (एमआयडीसी) मुख्य पाईपलाईन अचानक फुटल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. वर्दळीच्या आणि मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या रस्त्यावर पाईपलाईन फुटण्याची ही पहिलीच वेळ नसून, वारंवार घडणाऱ्या या प्रकारामुळे स्थानिक रहिवासी आणि प्रवाशांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.



"वारंवार घडणाऱ्या या प्रकारामुळे सर्वसामान्यांचे हाल होत आहेत. महामंडळाने तात्काळ ही अतिक्रमणे हटवून पाईपलाईनची दुरुस्ती कायमस्वरूपी करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल."
– स्थानिक नागरिक

या पाईपलाईनवर अनेक ठिकाणी अतिक्रमणे झाली आहेत. या अतिक्रमणांमुळे पाईपलाईनवर अतिरिक्त ताण येत असून ती वारंवार फुटत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी वारंवार केल्या आहेत. मात्र, महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाने या तक्रारींकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले आहे. तक्रार करूनही जर अतिक्रमण काढले जात नसेल, तर यामागे नेमके काय 'गौडबंगाल' आहे? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. कारखाना रस्ता हा अत्यंत रहदारीचा रस्ता आहे. अशा ठिकाणी वारंवार पाईपलाईन फुटणे हे मोठ्या दुर्घटनेला निमंत्रण देणारे आहे. एखादा गंभीर अपघात घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. पाईपलाईनवरील अतिक्रमणांना पाठबळ देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

## गोंधळी समाजाचा वधू-वर परिचय मेळावा; महापौर नागपुरे, धातुंडे यांचा नागरी सत्कार

### मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते ५ एप्रिलला समारंभ; परेश गरुड यांची माहिती

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** अखिल भारतीय गोंधळी समाज संघटना आणि गोंधळी व भटक्या विमुक्त जाती-जमाती विकास संघ, पुणे यांच्या वतीने समाजातील युवक-युवतींना विवाहासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी मोफत वधू-वर व पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या रविवारी (ता. ५ एप्रिल) सकाळी १० वाजता कर्वेनगर येथील शुभारंभ लॉन्स येथे हा मेळावा होणार आहे, अशी माहिती गोंधळी व भटक्या विमुक्त जाती-जमाती विकास संघाचे अध्यक्ष परेश गरुड यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी



उपाध्यक्ष चंदन अटक, सचिव हरीष पाचंगे, खजिनदार रमेश उबाळे, अखिल भारतीय गोंधळी समाजाच्या सदस्य रजनी पाचंगे आदी उपस्थित होते.

परेश गरुड म्हणाले, "या कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, अध्यक्षस्थानी भटके विमुक्त विकास परिषद व प्रतिष्ठानचे अध्यक्ष उद्धवजी काळे असतील. तसेच पुण्याच्या महापौर मंजुषाताई नागपुरे आणि इचलकरंजीचे महापौर उदयजी धांडे यांचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून वधू-वर नोंदणी, सर्वेक्षण तसेच जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला आणि कलाकार पेन्शन यांसारख्या शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. समाजातील तरुण-तरुणी, पालक, ज्येष्ठ नागरिक आणि कलाकार यांना एकत्र आणण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे."

## बाबीतळा राहाटीत आज श्री कुलस्वामी खंडेराया यात्रा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** ओतूर (बाबीतमळा-राहाटीमळा), ता.जुन्नर येथे, सालाबाद प्रमाणे चैत्र पौर्णिमा निमित्त आज गुरूवार दि.२ एप्रिल रोजी श्री कुलस्वामी खंडेराया यात्रा उत्सव संपन्न होणार असल्याची माहिती श्री कुलस्वामी खंडेराया देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शंकरराव गिते सचिव, उपाध्यक्ष संजय गिते, सचिव राजेंद्र गिते, खजिनदार जनार्दन गिते यांनी संयुक्तपणे दिली.

श्री कुलस्वामी खंडेराया यात्रा उत्सवानिमित्त आज विविध धार्मीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ७.३० ते ८ वाजता श्रीं चा अभिषेक, सकाळी ९ ते १२ वाजता मांडवडहाळे व श्रीं ची काठीची मिरवणूक सोहळा, दुपारी १ ते ९ वाजता महाप्रसाद, सायंकाळी ४ ते ९ वाजता तळी भंडारा व शेरणी वाटप, सायं.६ ते ८ वाजता देवाचा भंडारा व सत्कार समारंभ, सायंकाळी ६ ते १२ वाजता कुलस्वामी खंडेरायाचे जागरण कार्यक्रम होणार आहे.

येथील तरूण कार्यकर्ते दीपक गिते, विक्रम गिते, तान्हाजी गिते, ऋषिकेश भास्कर, श्रीकांत गिते, बंडू गिते, रज्जत गिते,

तुकाराम गिते, परेश गिते, प्रफुल्ल गिते, ऋषिकेश गिते, सतीश गिते, संतोष गिते, मयुर गिते, प्रदीप गिते, विकास गिते, अमोल गिते, मंगेश गिते, संदिप गिते, नंदू गिते याच बरोबर महिला कार्यकर्त्या वंदना



भास्कर, वैशाली गिते, निर्मला गिते, शारदा गिते, सुवर्णा गिते, रोहिणी गीते, सुजाता गिते, शिल्पा गिते, मनिषा गिते, प्रगती गिते, मंगल गिते, कुंदा गिते, संगीता गिते, शैला गिते, योगीता गिते, अपर्णा गिते, मयुरी गिते, सुरेखा गिते, अनिता गिते, छाया गिते, ललीता गिते, अर्चना गिते यांच्यासह बाबीतमळा-राहाटीमळा ग्रामस्थ व महिला कार्यकर्त्या यात्रा उत्सव, उत्साहात पार पाडण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

ओतूर आणि पंचक्रोशीतील नागरिकांनी या यात्रा उत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन श्री कुलस्वामी खंडेराया देवस्थान ट्रस्ट, समस्त ग्रामस्थ बाबीतमळा व रहाटीमळा ओतूर यांनी केले आहे.

## सावरगाव शिवारात ट्रकचालकावर दरोडा; १२ तासांत आरोपींना जामखेड पोलिसांनी केली अटक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**जामखेड :** ट्रक आडवून चालकाला मारहाण करत चाकूचा धाक दाखवून लुटमार करणाऱ्या आरोपींना जामखेड पोलिसांनी अवघ्या १२ तासांत अटक करत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, दि. ३१ मार्च २०२६ रोजी फिर्यादी संतोष बिभीषण फरताडे (रा. सोमनाथ वाडी, ता. जि. बीड) यांनी जामखेड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांनी सांगितले की, दि. ३० मार्च रोजी ते व बाळू शामराव तांबे (रा. परांडा, जि. धाराशिव) हे ट्रक (क्र. चक१४ डद ९९६९) मध्ये कोंबडीचे खाद्य घेऊन पुण्याहून माजलगावकडे जात होते.दि. ३१ मार्च रोजी मध्यरात्री सुमारे १२.३० वाजता जामखेड-साकत रोडवर, जामखेडपासून सुमारे ५ किमी अंतरावर स्पीड ब्रेकरमुळे ट्रकचा वेग कमी केला असता, एका स्कुटीस्वाराने ट्रकसमोर गाडी आडवी लावून ट्रक थांबवला. त्यानंतर मोटारसायकलवर आलेल्या तीन जणांनी ट्रकची काच फोडून चालक व सहचालकाला मारहाण केली आणि चाकूचा धाक दाखवून त्यांच्या खिशातील रोख रक्कम व गाडीतील साहित्य जबरदस्तीने लुटून नेले.

या प्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. १७५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६), ३२४(४), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनास्थळी मिळालेल्या मोटारसायकलच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला.

तांत्रिक माहितीच्या मदतीने आरोपींचा शोध घेत अवघ्या १२ तासांत १) शुभम सूर्यभान चव्हाण, २) शुभम ज्ञानोबा चव्हाण, ३) राम अशोक अडाले तसेच एका अल्पवयीन बालकाला ताब्यात घेण्यात आले. आरोपी हे सर्व सावरगाव, ता. जामखेड येथील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

## चांदेगावात तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील बेलापूर जवळील चांदेगाव येथील भांड वस्ती येथे धनंजय सखाहरी भांड या ३८ वर्षीय अविवाहित तरुणाने दि. १ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली.



धनंजय सखाहरी भांड हे राहुरी तालुक्यातील बेलापूर जवळील चांदेगाव येथे आपल्या कुटुंबा सोबत रहात होते. धनंजय भांड व त्यांचे कुटुंबीय रोजच्या प्रमाणे ३१ मार्च रोजी रात्री जेवण करून झोपी गेले. मात्र १ एप्रिल २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास धनंजय भांड हे घरातील पडवीत गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आले. सकाळी आई भीमाबाई भांड या पडवीत गेल्या असता त्यांना मुलगा गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यांनी आरडा ओरडा करत कुटुंबीय आणि शेजाऱ्यांना माहिती दिली. दरम्यान चांदेगाव येथील पोलीस पाटील संतोष खर्डे यांच्यासह बाबासाहेब भांड, शरद भांड, बाबू भांड, मयूर कुठळे, संदीप भांड यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि राहुरी पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर रवींद्र देवगिरे यांच्या रुग्णवाहिकेतून मृतदेह राहुरी ग्रामीण रुग्णालयात आणला. त्यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी धनंजय भांड यांना तपासून मृत घोषित केले. शवविच्छेदना नंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या बाबत राहुरी पोलीस ठाण्यात सध्या आकस्मात गुन्ह्याची नोंद करण्यात आली. धनंजय भांड यांनी आत्महत्या का केली याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना रात्री अंदाजे तीनच्या सुमारास घडली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

## दौंड तालुक्यात सायंकाळच्या लोडशेडिंगचा फटका

### बिबट्याच्या दहशतीमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** दौंड विभागामध्ये सध्या सायंकाळी ६ ते १० या वेळेत करण्यात येत असलेल्या लोडशेडिंगमुळे विद्यार्थी आणि ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे. या संदर्भात युवासेना उपप्रमुख (दौंड तालुका) अमोल किसन भागवत यांनी वीज विभागाच्या अभियंत्यांना निवेदनाद्वारे विनंती करून लोडशेडिंगच्या वेळेत बदल करण्याची मागणी केली आहे.



"सायंकाळच्या वेळी वीज गेल्यामुळे मुलांच्या मनात भीती वाढत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित आणि बिबट्यासारख्या हिंस्र प्राण्यापासून सुरक्षितता मिळावी, यासाठी प्रशासनाने लोडशेडिंगच्या वेळेबाबत त्वरित विचार करावा."
- अमोल भागवत (युवासेना उपप्रमुख, दौंड)

निवेदनात नमूद केल्यानुसार, सायं. ६ ते १० ही वेळ विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची मुख्य वेळ असते. याच काळात वीज पुरवठा खंडित होत असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीचा प्रश्न निर्माण झाला आहे. केवळ अभ्यासाचाच नाही, तर सुरक्षेचा मुद्दाही आता गंभीर बनला आहे.

शाळेजवळील चिकूच्या बागेत अलीकडेच बिबट्याचा वावर आढळून आला आहे. सायंकाळच्या वेळी अंधार पसरताच बिबट्याच्या भीतीमुळे मुलांमध्ये आणि पालकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण होते. अंधारामुळे या हिंस्र प्राण्यापासून स्वतःचा बचाव करणे कठीण जात असल्याने, या वेळेत वीज असणे अत्यंत गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## प्रेमविवाहावर 'सैराट'ची धमकी! पोलीस नातेवाईकाचा धाक, दौंडमध्ये कायद्यालाच आव्हान

### १४ महिन्यांनी पोलीस स्टेशन गाठलेल्या जोडप्याचा संघर्ष; नववधू बंदीवासात? साक्षीदारांना पिस्तूल दाखवत धमक्या

■ जनप्रवास प्रतिनिधी

**दौंड :** दौंड तालुक्यातील वासुंदे येथील एका प्रेमविवाह प्रकरणाने गंभीर वळण घेतले असून, कायद्याचा धाकच उडाल्याचे चित्र समोर आले आहे. वासुंदे येथील युवकाने २८ जानेवारी २०२५ रोजी बारामती तालुक्यातील तरुणीशी आळंदी येथे परस्पर संमतीने प्रेमविवाह केला होता. तब्बल १४ महिन्यांनंतर हे जोडपे दौंड पोलीस स्टेशनमध्ये हजर झाले. पोलिसांनी दोघांचे जबाब नोंदवून प्रकरण मिटवले असले तरी, त्यानंतर घडलेल्या घटनांनी खळबळ उडवली आहे.

भाजपाचा माजी पदाधिकारी असलेल्या नितीन थोरात या मुलीच्या मामासह मुंबई मध्ये पोलीस उपनिरीक्षक असलेल्या संभाजी गोलांडे या नातेवाईकाने मध्यस्थी करत दोन दिवसांत लग्न लावून देतो असे सांगून नववधूला आपल्या ताब्यात घेतले. मात्र त्यानंतर नवऱ्याला जीवेमारण्याच्या धमक्या देण्यात येत असून प्रेमविवाह रद्द कर, नाहीतर तुझा सैराट करू असा इशारा दिला जात असल्याचा आरोप आहे.

पोलीस उपनिरीक्षक नातेवाईकाने पिस्तूल दाखवत या प्रकरणातील साक्षीदारांनाही लक्ष्य करण्यात आले आहे. वासुंदे येथील एका फोटोग्राफर साक्षीदाराला संबंधित मुंबई येथे कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक संभाजी गोलांडे यांनी मारहाण करत पिस्तूल दाखवून गोळ्या घालू, बारामतीत फिरू देणार नाही, धंदा बंद कर अशा उघड धमक्या दिल्याची तक्रार दौंड पोलीस ठाण्यात दाखल २९/०३/२०२६ रोजी दाखल झाली आहे. यावेळी इतर चार आरोपी उपस्थित असल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

डीजीपी कार्यालयाचा धाक दाखवत पोलीस अधिकाऱ्याचा गवगवा; पदाचा उघड गैरवापर?संबंधित पोलीस अधिकारी संभाजी शिवाजी गोलांडे हा मी मुंबईतील पोलीस महासंचालक कार्यालयात काम करतो, अशा वल्गना करीत आहेत. त्यामुळे आमचं कोणी काहीही बिघडवू शकत नाही, असा उघड गवगवा परिसरात करत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या वक्तव्यामुळे संबंधित अधिकारी आपल्या पदाचा राजरोसपणे गैरवापर करत असल्याचे स्पष्ट होत असून, कायद्याचा धाक दाखवण्याऐवजी स्वतःच कायद्याच्या पलीकडे असल्याचा आव आणत असल्याची चर्चा रंगली आहे.

संपर्क तोडल्याच्या घटनेनंतर नववधूला नवऱ्याशी ना बोलू दिले जात आहे, ना भेटू दिले जात आहे. मुलाकडील कुटुंबीयांच्या मते, नववधूला बळजबरीने बंदीवासात ठेवण्यात आले आहे. अशी माहिती कुटुंबीय देत आहेत.

आम्ही जेलमध्ये बसायला तयार आहे, प्रेमविवाह केलेल्या मुलीचे वडील, पोलीस उपनिरीक्षक नातेवाईक, मामा थोरात आणि चुलतभाऊ हे फोनवरून उघडपणे धमक्या देत आहेत. आम्हाला हा विवाह मान्य नाही, आम्ही तुम्हाला संपवू... आम्ही जेलमध्ये बसायला तयार आहोत, अशा शब्दांत दबाव टाकला जात असल्याने कायद्याचा वचक राहिला आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

संबंधित पोलीस उपनिरीक्षकाने गैरवर्तन करुनही अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या भुमिकेकडे लक्ष लागले आहे.

## केडगाव येथे हातभट्टी दारू विक्रीवर छापा; एक जेरबंद

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** केडगाव परिसरात बेकायदेशीर हातभट्टी दारू विक्री करणाऱ्यावर कोतवाली पोलीस स्टेशनच्या पथकाने छापा टाकून एका आरोपीस जेरबंद केले. ही कारवाई मंगळवार (दि. ३१ मार्च २०२६) रोजी सायंकाळी करण्यात आली.

पोलीस हेड कॉन्स्टेबल विश्वास ज्ञानदेव गाजरे (वय ४८) यांनी दिलेल्या माहितीनुसार, केडगाव पोलीस चौकीचे तपासी अधिकारी म्हणून कार्यरत असताना गुप्त बातमीदारामार्फत तळेवाडी येथील गुरुदत्त हॉटेल मागील पत्र्याच्या शेडमध्ये एक व्यक्ती बेकायदेशीर हातभट्टी दारूची विक्री करत असल्याची माहिती मिळाली. याबाबत पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना कळवून त्यांच्या सूचनेनुसार पथकाने तातडीने कारवाई केली. सदर ठिकाणी सायंकाळी सुमारे ५ वाजता छापा टाकण्यात आला असता, सोनू एकनाथ कोतकर (वय २७, रा. अंबिकानगर, केडगाव) हा इसम प्लास्टिक ड्रमसह आढळून आला. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून सुमारे २० लिटर तयार हातभट्टी दारू (अंदाजे किंमत २ हजार रुपये) जप्त करण्यात आली.

पोहेकॉ. आर. एन. शिंदे यांनी पंचांसमक्ष जागीच पंचनामा करून मुद्देमाल जप्त केला. त्यातील नमुना केमिकल तपासणीसाठी राखून ठेवण्यात आला असून उर्वरित दारू नष्ट करण्यात आली आहे.

या प्रकरणी आरोपी सोनू कोतकर याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कोतवाली पोलीस करत आहेत.

## संक्षीप्त वृत्त

### हायब इंडिया कडून देशव्यापी गर्ल ग्रुप ऑडिशनची घोषणा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** हायब इंडिया ने आज जाहीर केले की त्यांनी नवीन गर्ल ग्रुप ऑडिशनसाठी अर्ज खुले केले आहेत. टॅलेंट स्काऊटिंग ३१ मार्च ते ३१ जुलै २०२६ दरम्यान होणार आहे. या ऑडिशनमध्ये भारतभरातील २००५ ते २०११ दरम्यान जन्मलेल्या महिला टॅलेंटना आपली व्यक्तिमत्व आणि क्रिएटिव्हिटी दाखवण्याची संधी मिळणार आहे. अर्जाच्या कॅटेगरीमध्ये व्होकल्स, रॅप, डान्स, अभिनय, मॉडेलिंग आणि इतर परफॉर्मन्स प्रकारांचा समावेश आहे. गर्ल ग्रुपवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय हा हायब इंडिया ने मागील काही वर्षांत केलेल्या ऑनलाइन आणि इन–पर्सन रिसर्चवर आधारित आहे. नील्सन सोबत केलेल्या देशव्यापी क्वांटिटेटिव्ह स्टडी आणि सहा प्रमुख शहरांतील क्वालिटेटिव्ह रिसर्चमधून हे स्पष्ट झाले की तरुण भारतीय महिलांना अशा कलाकारांची अपेक्षा आहे जे त्यांच्या आवाजाचे प्रतिनिधित्व करतील आणि प्रेरणादायी रोल मॉडेल ठरतील. यावरून हायब इंडिया ने 'हार्मनी इन डायव्हर्सिटी' या संकल्पनेतून भारतीय महिलांच्या खरी कहाणी आणि आवाज जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणाऱ्या गर्ल ग्रुपची संधी ओळखली.

### माळीवाडा परिसरात 'फॉर्च्यून फूडस्' दालनाचे उत्साहात उद्‌घाटन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शहरातील माळीवाडा परिसरात निसर्गाचा अनमोल खजिना आणि शुद्धतेची खात्री देणारे 'फॉर्च्यून फूडस्' या दालनाचे उद्घाटन रविवारी (दि. २९ मार्च) आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. जुनी वसंत टॉकीज रोडवरील कावरे हाईटस् येथे हे दालन ग्राहकांच्या सेवेत दाखल झाले आहे. या उद्घाटन सोहळ्याला नगरसेवक संपत बारस्कर, अविनाश घुले, बाळासाहेब बोराटे, संभाजी कदम यांच्यासह जाखोटिया परिवारातील भरत जाखोटिया, अनिरुद्ध जाखोटिया, पराग जाखोटिया व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माहिती देताना संचालक अनिरुद्ध जाखोटिया यांनी सांगितले की, अहिल्यानगरवासीयांना एकाच छताखाली जागतिक दर्जाचे ड्रायफ्रूट्स (सुकामेवा), ड्राइड फ्रूट्स, फ्रेश फ्रूट्स, सुगंधी मसाले, चॉकलेट्स तसेच विविध प्रकारचे सीड्स उपलब्ध करून देणे हा 'फॉर्च्यून फूडस्'चा मुख्य उद्देश आहे. झऑलीश`ष झींॲळीं या संकल्पनेतून ग्राहकांना शुद्धतेची हमी दिली जात असून, सण–समारंभांसाठी आकर्षक गिफ्ट हॅम्पर्सचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### किंगफिशर स्मूथ महाराष्ट्रात लॉन्च, किंगफिशरच्या मुख्य स्ट्राँग बिअर पोर्टफोलिओचा विस्तार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** हेनेकेन कंपनीचा भाग असलेल्या युनायटेड ब्रुअरीज लिमिटेड (यूबीएल) ने आज महाराष्ट्रात किंगफिशर स्मूथ लॉन्च केल्याची घोषणा केली. किंगफिशर पोर्टफोलिओमधील हा एक महत्त्वाचा नवीन प्रकार असून, तो मुख्य स्ट्राँग बिअर विभागात ब्रँडची उपस्थिती अधिक मजबूत करतो. कंपनी सध्या जास्त विक्री होणाऱ्या हंगामासाठी तयारी करत आहे. या लॉन्चमुळे किंगफिशर स्मूथला वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमध्ये विस्तार करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. मजबूत रिटेल नेटवर्क आणि मोठा ग्राहक वर्ग असलेल्या महाराष्ट्रात विस्तारासाठी मोठी संधी आहे. यापूर्वी राजस्थान आणि कर्नाटकमध्ये किंगफिशर स्मूथला ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

### गार्निअर कलर नॅचरल्सने रवीना टंडन आणि राशा थडानी यांच्यासोबत नव्या मोहिमेद्वारे मातृ–कन्या संबंधांचा उत्सव साजरा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** गार्नियर कलर नेचरल्सने अभिनेत्री रवीना टंडनसोबतचा आपला संबंध अधिक मजबूत केला असून आता त्यांच्या मुली राशा थडानीला नवीन कॅम्पेनमध्ये सादर केले आहे. या कॅम्पेनमध्ये खरी आई–मुलीची जोडी दाखवली आहे जी ब्रँडचा मुख्य स्तंभ विश्वास अधोरेखित करते आणि घरबसल्या सहज हेअर कलरिंगचा उत्सव साजरा करते. हे ब्रँडसाठी नैसर्गिक पुढचे पाऊल आहे, ज्यात गार्नियर कलर नेचरल्सची विश्वासार्ह, नैसर्गिक दिसणाऱ्या हेअर कलरची परंपरा रवीना यांच्या पिढ्यानपिढ्या पोहोचणाऱ्या आकर्षणासोबत आणि राशाच्या नव्या पिढीच्या ताजेपणा व जोडणीसोबत एकत्र केली आहे.

एक आयकॉनिक स्टार म्हणून रवीना, आपल्या मुलीसोबत या कॅम्पेनमध्ये सहज उबदारपणा आणि खरी भावना आणतात. फिल्ममध्ये आई–मुलीमधील एक कोमल, रोजचा क्षण दाखवला आहे, जिथे राशा केस रंगवल्यानंतर आईकडे आत्मविश्वासाची खात्री मागते. त्यानंतर होणारा साधा पण अर्थपूर्ण संवाद दाखवतो की आईची मान्यता आत्मविश्वास निर्माण करण्यात किती महत्त्वाची असते. त्यांची नैसर्गिक केमिस्ट्री आणि सहज संवाद हा क्षण अत्यंत रिलेटेबल बनवतो, दाखवतो की सौंदर्याचे निर्णय अनेकदा विश्वास, सामायिक अनुभव आणि मान्यतेच्या आरामावर आधारित असतात.

### बेलवंडी परिसरात घरफोडी; चोरट्यांचा हल्ला, ७० हजारांचा मुद्देमाल लंपास

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी परिसरात ३१ मार्चच्या पहाटे घरफोडीची धक्कादायक घटना घडली असून सुमारे ७० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व इतर साहित्य चोरीस गेल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ३१ मार्च २०२६ रोजी पहाटे २.०० ते २.३० वाजण्याच्या सुमारास साळवे वस्ती जवळ, चिंभळा (ता. श्रीगोंदा) येथील सतिष ज्ञानदेव वाजे यांच्या घरात तीन अज्ञात चोरट्यांनी घरफोडी केली. चोरट्यांनी घरातील सुमारे ७० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने तसेच चाव्या चोरून नेल्या. दरम्यान, चोरी सुरू असताना घरातील सदस्यांना जाग आल्याने त्यांनी आरडाओरडा केला. यावेळी सतिष वाजे यांनी चोरट्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता, एका चोरट्याने चाकूने हल्ला करून त्यांच्या उजव्या हाताच्या अंगठ्याजवळ जखम केली. या घटनेदरम्यान परिसरातील इतर ठिकाणीही चोरी झाल्याची माहिती समोर आली आहे. सुनिल हरिभाऊ वाजे (रा. वाजेवस्ती, बेलवंडी) आणि पोपट राघु केसकर (रा. चिंभळा) यांच्या घरातही चोरी झाली असून, पांडुरंग ईथापे यांची स्प्लेंडर मोटारसायकल चोरट्यांनी लंपास केल्याचे समजते. या प्रकरणी राहुल बबन अडागळे (वय ४०, रा. चिंभळा, ता. श्रीगोंदा) यांनी फिर्याद दिली असून, बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८०/२०२६ नुसार बीएनएस २०२३ च्या कलम ३०५ व ३३१(६) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अद्याप आरोपी अज्ञात असून अटक झालेली नाही.

# संत सावता सोसायटीची शंभर टक्के कर्ज वसुलीची परंपरा कायम

## ३१ मार्चला सभासदांनी दिला कर्जाचा वसुल



■ जनप्रवास वार्ताहार

**टाकळीभान :** संस्थेच्या स्थापनेपासुन कर्जाचा १०० टक्के वसुल देण्याची परंपरा गेली १५ वर्षांपासुन आहे. माजी आमदार स्व. जयंतराव ससाने, स्व. भाऊसाहेब दाभाडे दिवंगत चेअरमन स्व. एकनाथ लोखंडे यांनी घालुन दिलेला आदर्श पुढे सुरु ठेवत संस्थेने यंदाही ३१ मार्च अखेर बँक पातळीवर १०० टक्के वसुल देवुन परंपरा कायम राखली आहे.

श्रीरामपुर तालुक्याच्या पुर्व भागातील महत्वाच्या आसलेल्या टाकळीभान येथील श्री संत सावता माळी वि.वि.कार्य. सेवा सोसायटीची गेली १५ वर्ष शंभर टक्के वसुल देण्याची परंपरा आहे. माजी आमदार स्व जयंतराव ससाने संस्थेचे संचालक आसताना त्यांनी संस्थेला ही शिस्त लावली आहे. संस्थेचे चेअरमन स्व. एकनाथ लोखंडे, जेष्ठ संचालक स्व भाऊसाहेब दाभाडे व चंद्रकांत लांडगे यांनी हा आदर्श संस्थेत रुजवण्यासाठी प्रथम पासुन प्रयत्न केले. स्व. जयंतराव ससाने यांच्यानंतर नगराध्यक्ष तथा जिल्हा सह. बँकेचे संचालक करण ससाने यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था प्रगतीपथावर आहे. काल ३१ मार्च रोजी संस्थेच्या सर्व कर्जदार सभासदांनी घेतलेल्या ७४.७१ उचल केलेल्या कर्जाचा संपुर्ण भरणा करुन संस्थेने बँक पातळीवर १०० टक्के वसुल बँकेला दिला आहे. याकामी संस्थेचे शाखाधिकारी भरत क्षिरसागर, लिपिक सुहास भागवत, जयश्री परदेशी, दत्तात्रय सोमासे, कशिआर प्राजक्ता राजभोज, संस्थेचे सचिव रामनाथ ब्राम्हणे, विठ्ठल बनकर, रवि शिरसाठ, रघुनाथ शेळके यांचे मोलाचे सहकार्य लाभले. वसुली कामी संस्थेचे चेअरमन बाबासाहेब तनपुरे, व्हा चेअरमन शिवाजी शिरसाठ, जेष्ठ संचालक बाबासाहेब बनकर, चंद्रकांत लांडगे, विलास दाभाडे, प्रकाश दाभाडे, बाबासाहेब लोखंडे, भारत भवार, मोहन रणनवरे आदींनी विषेश परीश्रम घेतले. सर्व सभासदांच्या सहकार्यामुळे १०० टक्के वसुलाची परंपरा कायम राखता आल्याची प्रतिक्रीया यावेळी संचालकांच्या वतीने देण्यात आली. शाखाधिकारी क्षिरसागर यांनी संचालक मंडळाचा सत्कार करुन संस्थेच्या पदाधिकार्यांचे अभिनंदन केले.

## भगवान महावीरांना पुणतांब्यात अभिवादन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणतांबा :** येथील जैन स्थानक मध्ये भगवान महावीरस्वामी जन्म कल्याणक सोहळा अतिशय भक्तीयुक्त वातावरणात उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात नवकार महामंत्र पठणाने झाली.



याप्रसंगी भगवान महावीरस्वामींचे नाम स्मरण चा सामुहिक जप करून भाव वंदना करण्यात आली.

सकल जैन समाजाच्या बहु मंडळाने महावीर जन्मावर आधारित अतिशय सुरेख नाट्यछटा सादर केली तर बच्चे कंपनीने विविध भक्तीगीत व नृत्य सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. वर्धमान श्रावक संघ च्या वतीने उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी संकलेचा, लोढा, जाजु, बाहेती, श्रीश्रीमाळ, काबरा, भाटी, चोरडिया इ. परिवारातील सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेतल बाहेती हिने तर आभार प्रदर्शन संतोष चोरडिया यांनी केले. राजकुमार लोढा व विरचंद संकलेचा यांचेकडून लहान मुलांना प्रोत्साहनार्थ बक्षीसे तर संतोष संकलेचा यांचेकडून प्रभावना देण्यात आली. जैन राष्ट्रगीत व मंगलपाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## गोदरेज कंपनीचा माल अफरातफर प्रकरणी २ आरोपी जेरबंद

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** एम.आय.डी.सी. परिसरातील गोदरेज कंपनीच्या मालाची अफरातफर करून परस्पर विल्हेवाट लावणाऱ्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. या कारवाईमुळे सुमारे २,७७,३११ रुपयांचा मुद्देमाल उघडकीस आला आहे.



या प्रकरणी फिर्यादी वैभव चंद्रकांत मचाले (वय ४५, रा. आनंदनगर हौसिंग सोसायटी, गुलमोहर रोड, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिनांक १ जानेवारी २०२६ ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत वडगाव गुप्ता शिवारातील गोदामातून गोदरेज कंपनीचा माल व्हॅन सेल्स रिप्रेझेंटेटिव्ह अंबादास दराडे व वाहन चालक देविदास साबळे यांनी त्यांच्या ताब्यातील वाहनातून नेऊन स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी अपहार केल्याचे निष्पन्न झाले. या संदर्भात एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नं. २२२/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०६, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी पथक तयार करून आरोपींचा शोध सुरू केला. सहाय्यक पोलीस निरीक्षक हरिष भोये, पोलीस कर्मचारी सुरेश माळी, विष्णू भागवत, फुरकान शेख, सागर ससाणे, महिला पोलीस कर्मचारी सोनल भागवत व चालक भगवान धुळे यांच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे सांगवी खुर्द येथे सापळा रचून आरोपी अंबादास शंकर दराडे (वय २८) यास ताब्यात घेतले.

## गैरसमज पसरवणाऱ्या चॅनेल्सविरोधात कारवाईचा इशारा : प्राजक्त तनपुरे

■ जनप्रवास वार्ताहार

**राहुरी :** राहुरी विधानसभा पोट–निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले असून, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी काही स्थानिक चॅनेल्सवर गंभीर आरोप करत निवडणूक आयोगाकडे तक्रार करण्याचा इशारा दिला आहे. आहिल्यानगर येथील काही लोकल चॅनेल्सकडून चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसारित केल्या जात असल्यामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होत असून निवडणुकीचे वातावरण दूषित होत असल्याचे त्यांनी सांगितले.

तनपुरे यांनी स्पष्ट केले की, मी राहुरी विधानसभा पोटनिवडणूक लढवणार असून त्यासाठी पूर्ण तयारी सुरू आहे. मात्र काही माध्यमांकडून जाणूनबुजून अफवा पसरवून गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. चुकीची माहिती पसरवून माझी प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या प्रकारामुळे कार्यकर्ते व समर्थकांमध्ये गैरसमज निर्माण होत असून निवडणुकीच्या प्रक्रियेवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे संबंधित चॅनेल्सविरोधात निवडणूक आयोगाकडे अधिकृत तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच अशा प्रकारच्या खोट्या बातम्यांवर तातडीने नियंत्रण आणण्याची मागणीही त्यांनी केली.



दरम्यान, राहुरी मतदारसंघात राजकीय हालचालींना वेग आला असून विविध पक्षांकडून उमेदवारीबाबत चाचपणी सुरू आहे. प्राजक्त तनपुरे हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाकडून किंवा अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची शक्यता जवळपास निश्चित मानली जात आहे. त्यामुळे या मतदारसंघातील लढत चुरशीची होण्याचे संकेत मिळत आहेत.

सध्या विरोधकांकडून विविध आरोप–प्रत्यारोपांचे सत्र सुरू असून, विशेषतः आर्थिक बाबींशी संबंधित अफवा पसरवल्या जात असल्याचा आरोप तनपुरे यांनी केला आहे. यामुळे राजकीय वातावरण अधिक ढवळून निघण्याची शक्यता व्यक्त होत असून, निवडणुकीपूर्वी परिस्थिती आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

एकूणच, राहुरी पोटनिवडणुकीत प्रचाराची रंगत वाढत असताना आरोप–प्रत्यारोप आणि अफवांचे सावटही वाढत असून, निष्पक्ष व पारदर्शक निवडणूक प्रक्रियेसाठी प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## वकील, न्यायालयीन कर्मचारी व कुटुंबीयांना आरोग्य सुरक्षा कवचासाठी महत्त्वपूर्ण बैठक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील वकील, न्यायालयीन कर्मचारी, न्यायाधीश तसेच त्यांच्या कुटुंबीयांना आरोग्य सुरक्षा कवच मिळावे या उद्देशाने जिल्हा न्यायालयात नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना या योजनांचा संयुक्त लाभ सर्व पात्र घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसद यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला आहे.

ही बैठक प्रधान जिल्हा न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी आयुष्मान भारत योजनेचे जिल्हा प्रमुख डॉ. अनिकेत भालसिंग, दक्षता अधिकारी व्ही. बी. वांडेकर, टीम लीडर हर्षवर्धन साळवे, पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी तसेच ॲड. अमित थोरात आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, उत्पन्नाची कोणतीही अट न ठेवता न्यायव्यवस्थेशी संबंधित सर्व पात्र घटकांना या योजनांचा लाभ देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या निर्णयामुळे जिल्ह्यातील सुमारे १० हजार कुटुंबांना मोफत व कॅशलेस वैद्यकीय उपचाराची सुविधा उपलब्ध होणार आहे.

## वरखेड यात्रेच्या पार्श्वभूमीवर आमदार लंघे पाटील यांच्या उपस्थितीत नियोजन बैठक संपन्न

### लक्ष्मीआई वरखेडची यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी दक्षता घेऊ–आमदार विठ्ठलराव लंघे पाटील

■ जनप्रवास प्रतिनिधी

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील वरखेड येथे दि.७ एप्रिल रोजी होणाऱ्या लक्ष्मी आईच्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विविध खात्याच्या अधिकाऱ्यांच्या समवेत नियोजन बैठक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या लक्ष्मी आई वरखेडची यात्रा उत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी दक्षता घेऊ,भाविकांना सुविधा योग्य पद्धतीने कशा उपलब्ध होतील यासाठी प्रशासकीय पातळीवर अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावा असे आवाहन आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी यावेळी बोलतांना केले.



यावेळी झालेल्या नियोजन बैठकीच्या प्रसंगी तहसीलदार डॉ.संजय बिरादार,गटविकास अधिकारी संजय लखवाल,पोलीस निरीक्षक महेश पाटील,दलित बहुजन चळवळीतील नेते सुधीर वैरागर,देवस्थानचे अध्यक्ष कडूबाळ गोरे पाटील,उपाध्यक्ष लक्षाधीश दाणे माजी जिल्हा परिषद सदस्य पुरुषोत्तम सर्जे,सरपंच विनोद ढोकणे,पोपटराव सरोदे,पोलीस पाटील संतोष घुंगासे, विजय शिरसाठ यांच्यासह विविध खात्याचे अधिकारी, देवस्थानचे सर्व विश्वस्त,ग्रामस्थ गावातील तरुण मंडळाचे पदाधिकारी बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांना मिळण्यासाठी मुकुंदनगरला माहिती केंद्राचे उद्‌घाटन संपन्न

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावा, तसेच गरजू व्यक्तींना योग्य मार्गदर्शन व मदत मिळावी या उद्देशाने पीस फाउंडेशनच्या वतीने मुकुंदनगर येथे माहिती केंद्र कार्यान्वीत करण्यात आले आहे. या केंद्राचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिक शेख अब्दुल कादीर यांच्या हस्ते करण्यात आले.

या उद्घाटन सोहळ्यास नगरसेवक शम्स खान आणि खालीद शेख हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, युवक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात पीस फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अर्शद शेख यांनी सांगितले की, शासनाच्या विविध योजनांची माहिती योग्य पद्धतीने जनतेपर्यंत पोहोचत नसल्यामुळे अनेक पात्र लाभार्थी वंचित राहतात. ही समस्या लक्षात घेऊनच या माहिती केंद्राची सुरुवात करण्यात आली आहे. या केंद्राद्वारे शासकीय योजनांची सविस्तर माहिती देणे, अर्ज प्रक्रिया समजावून




सांगणे आणि आवश्यक तेथे पाठपुरावा करणे अशी सेवा दिली जाणार आहे. तसेच एसआयआर संदर्भातील माहितीही येथे उपलब्ध करून दिली जाणार आहे. पीस फाउंडेशनने अशा प्रकारचे अनेक माहिती केंद्र महाराष्ट्रातील विविध शहरे व उपनगरांमध्ये सुरू केले असून, या उपक्रमाचा नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमादरम्यान पाहुण्यांचे स्वागत पीस फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष ॲड. नदीम सय्यद यांनी केले.

# पाटस ग्रामपंचायतीचा बेजबाबदारपणा; कोट्यवधींचा जॉगिंग ट्रॅक धोक्यात, ३० वर्षांची वृक्षसंपदा खाक!

## पुढारी आणि वनविभागाच्या 'संगनमता'ची ग्रामस्थांमध्ये चर्चा; काळुबाई मंदिर परिसराचा वीजपुरवठा खंडित

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**पाटस :** स्वच्छतेच्या नावाखाली निसर्गाचा गळा घोटण्याचा प्रकार पाटस येथे उघडकीस आला आहे. ग्रामपंचायतीच्या सफाई कामगारांनी कचरा जाळल्यामुळे तब्बल २५ ते ३० वर्षे जुनी निलगिरीची काही झाडे जळाली असून, यामुळे सुमारे एक कोटी रुपये खर्च करून उभारलेल्या जॉगिंग ट्रॅकचेही नुकसान झाले आहे. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली असून, स्थानिक राजकारणी आणि वनविभागाच्या 'अर्थपूर्ण' डोळेझाकपणावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पाटस येथील जॉगिंग ट्रॅक परिसरात साफसफाई केल्यानंतर सफाई कामगार महिलांनी गोळा केलेला कचरा तिथेच पेटवून दिला. या आगीची झळ शेजारीच असलेल्या २५-३० वर्षे जुन्या डौलदार निलगिरीच्या झाडांना बसली. आगीमुळे झाडांचे बुंधे जळाल्याने काही महाकाय वृक्ष उन्मळून थेट जॉगिंग ट्रॅकच्या संरक्षित कठड्यावर कोसळले. यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा निधी खर्च करून बांधलेला कठडा तुटला आहे.

या घटनेमागे केवळ निष्काळजीपणा नसून मोठे साटलोटं असण्याची शक्यता ग्रामस्थांनी वर्तवली आहे. 'झाडे जुनी झाली आहेत', 'कोलमडून पडू शकतात' किंवा 'सुशोभीकरण करायचे आहे' अशी कारणे पुढे करून येथील मौल्यवान झाडे तोडून त्यांची परस्पर विल्हेवाट लावली जात असल्याचा खळबळजनक आरोप नागरिक दबक्या आवाजात करत आहेत. या वृक्षतोडीतून मिळणारा पैसा कोणाच्या खिशात जातो? वनविभाग वारंवार तक्रारी करूनही गप्प का? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.



> ग्रामपंचायतीने या नुकसानीची जबाबदारी स्वीकारून मंदिराचा वीजपुरवठा तात्काळ सुरू करावा. डोळ्यादेखत वनसंपत्तीची हानी होत असताना वनखाते कुंभकर्णी झोपेत का आहे? पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आणि त्यांना आदेश देणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल होणार का? असे प्रश्न नागरिकांमधून विचारले जात आहेत. "एकीकडे वृक्षारोपणाचा गाजावाजा करायचा आणि दुसरीकडे वाढलेली झाडे जाळून ती विकण्याचा धंदा करायचा, हा पाटसच्या जनतेसोबत केलेला विश्वासघात आहे. प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल!"
>
> – संतप्त ग्रामस्थ, पाटस.

जळालेल्या झाडांमधून अजूनही आगीचे लोळ आणि धूर निघत असून, अनेक झाडे अर्ध्यावर झुलत आहेत. यामुळे जॉगिंग ट्रॅकवर व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांच्या जिवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. झाडे कोसळल्याने काळुबाई मंदिर परिसरातील विद्युत तारा तुटून पडल्या असून, संपूर्ण परिसराचा वीजपुरवठा खंडित झाला आहे.

# जामखेड ते बीड रोडवरील कॅफे चेसवर पोलीस पथकाचा छापा; अश्लील चाळ्यांना आळा

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**जामखेड :** अहिल्यानगर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या आदेशाने जामखेड पोलीस स्टेशन हद्दीत अवैद्य धंद्यावर कारवाई करत असताना,धडझ प्रवीण लोखंडे यांना गोपनिय बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, जामखेड ते बीड जाणाऱ्या रोडवर कॅफे चेस येथे इसम नामे राहूल संदिप श्रीरामे, रा. बटेवाडी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर याने एका खोली मध्ये पार्टीशन करुन मुला मुलींना तेथे बंदिस्त जागा उपलब्ध करुन दिली असुन तेथे अश्लील चाळे चालतात म

मिळालेल्या माहितीनुसार, दि.३१/०३/२०२६ रोजी ११/३० वा. सुमारास धडझ प्रवीण लोखंडे यांच्या पथकातील सफौ / बबन मखरे, पोकॉ २५२६ मनोज शिवाजी लातुरकर, पोहेकॉ अमोल भैलुमे, म पोहेकॉ/ वनमाला तोरडमल यांनी ठिक ११/४० वा. सुमारास छापा टाकला असता सदर ठिकाणी राहुल संदिप श्रीरामे, वय २५ वर्षे, रा.बटेवाडी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर याने कॅफे मध्ये सार्वजनिक ठिकाणी बंदिस्त रुममध्ये वेगवेगळे पार्टीशन करुन अश्लील चाळे करण्याकरीता स्वता:चे आर्थीक फायद्याकरीता भाड्याने कंपार्टमेंट देवुन व्यवस्था केल्याचे दिसत आहे. राहुल संदिप श्रीरामे, वय २५ वर्षे, रा. बटेवाडी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर याचे विरुध्द भारतीय न्याय संहिता

उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय यांचे पोलीस कॉन्स्टेबल मनोज लातूरकर यांनी संबंधित आरोपी विरोधात २०२३ चे कलम २९४ जामखेड पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली साहेब फौजदार एस डी कदम हे करत आहेत

# राहुरीत भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव उत्साहात; भव्य शोभायात्रेने शहर भक्तिमय

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**राहुरी :** राहुरी शहरात जैन समाजाच्या वतीने श्वेतांबर भगवान महावीर स्वामी यांच्या २६२५ व्या जन्मकल्याणक महोत्सवा निमित्त राहुरी शहरात पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात भव्य शोभा यात्रेने संपूर्ण शहर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले.



शहरातील जैन स्थानक येथून भगवान महावीरांच्या प्रतिमेची रथातून मिरवणूक काढण्यात आली. ही शोभा यात्रा शिवाजी चौक, शुक्लेश्वर चौक, कुलकर्णी हॉस्पिटल, नगर-मनमाड रोड, नवी पेठ, पृथ्वी कॉर्नर, शनिचौक, नगरपालिका मार्गे पुन्हा जैन स्थानक येथे समारोप करण्यात आला. या मिरवणुकीत जैन समाजातील सर्व संस्था, पदाधिकारी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पुरुष व महिलांनी भगवान महावीरांच्या अहिंसा, करुणा आणि विश्वशांतीच्या संदेशाचा जयघोष केला. लहान मुला-मुलींनी लेझीम सादर करत वातावरण अधिक उत्साही केले. मिरवणुकी दरम्यान नागरिकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. लोकनियुक्त नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनी भगवान महावीरांना पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीत सहभाग नोंदविला. या शोभा यात्रेत प्रकाश पारख, किरण सुराणा, अमित राका, ईश्वर सुराणा, प्रशांत नहार, निलेश बोरा, गिरीश अग्रवाल, महेश चुत्तर, योगेश चुत्तर, प्रदीप नहार, रुपेश सुराणा, जितेंद्र लुक्कड, तेजस लुक्कड, संकेत राका, इंजि. रुपेश सुराणा, अभिजीत सुराणा, विजय मुथ्था, संजय सुराणा, संतोष लोढा, पारस बाफणा, रुपेश बाफणा, अनिल सुराणा, प्रमोद मुथ्था, प्रदीप राका, सुरेश राका, संजय बोगावत, बाळासाहेब भट्टड, सौरभ भनसाळी, राजेंद्र भनसाळी, सुरेश चुत्तर, संजय पारख, शुभम पारख, हर्षदीप सुराणा, संजय सुराणा,दीपक मुथ्था आदी मान्यवर सहभागी झाले होते. संपूर्ण कार्यक्रम भक्तीभाव, शिस्त आणि धार्मिक उत्साहात पार पडला.

# हिंदू धर्माच्या रक्षणासाठी सर्वांनी एकत्रित येऊन लढा दिला पाहिजे

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**पुणतांबा :** हिंदू धर्माच्या रक्षणासाठी सर्वांनी एकत्रित येऊन लढा दिला पाहिजे हिंदू धर्मावरील संकटे व आव्हाने मोठ्या प्रमाणावर असून त्यावर मात करण्यासाठी हिंदू सारा एक याप्रमाणे सर्वांनी एकत्र येऊन परकीय शक्ती विरोधात लढा दिला पाहिजे असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्राचे प्रांत सहकार्यवाह सचिन कुलकर्णी यांनी केले

सकल हिंदू समाजाच्या वतीने येथे हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी शिवचरित्र व्याख्याते ह भ प नवनाथ महाराज म्हस्के, गंगागिरी महाराज आश्रमाचे विजयानंद गिरी महाराज, मातृशक्तीच्या हेमलता भामरे, हिंदू संमेलन समितीचे अध्यक्ष शिवाजी प्रधान तसेच सर्व हिंदू समाज बांधव उपस्थित होते,

यावेळी संत पूजन करण्यात आले. नवनाथ महाराज म्हस्के म्हणाले की हिंदू संमेलन घेण्याची गरज का होत आहे याचा विचार सर्वांनी केला पाहिजे जगाच्या तुलनेत हिंदू समाज कुठे आहे हिंदू समाजावरील संकटे आव्हाने याचा विचार सर्वांनी करून एकत्रित येण्याची काळाची गरज आहे जातपात धर्म न मानता फक्त हिंदू धर्म म्हणून एकत्रित येऊन परकीय शक्ती विरोधात लढा दिला पाहिजे कुलकर्णी म्हणाले की हिंदू संमेलन घेण्याचा उद्देश सांगताना त्यांनी सांगितले की हिंदू समाजापुढील आव्हाने सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघ करीत असून जगात शांतता प्रस्थापित करण्याची भूमिका सर्वांची आहे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जातपात धर्म मानत नाही तो फक्त हिंदू असला पाहिजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेतून जे संस्कार घडतात त्याच्यातून समाज घडवण्याचे कार्य संघ अखंडपणे करीत असून शताब्दी वर्षात संघाने पदार्पण केले असून हिंदू धर्म टिकला पाहिजे ही भूमिका आपल्या सर्वांची असून संघ कोणाच्या विरोधात नाही असे त्यांनी सांगितले, पसायदानाने संमेलनाची सांगता झाली.

# भगवान महावीरांची तत्त्वे अंगीकारावी : नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**राहाता :** जैन धर्मियांचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीरांनी दिलेला जगा आणि जगू द्या हा संदेश कृतीत आणावा भगवान महावीरांनी दिलेल्या अहिंसा सत्य आणि करुणा या तत्वांचा जीवनात प्रत्येक व्यक्तीने अंगीकार करणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन राहाता नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ स्वाधीन गाडेकर यांनी केले आहे



भगवान महावीर जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात नगराध्यक्ष डॉ.स्वाधीन गाडेकर यांच्या हस्ते भगवान महावीरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले याप्रसंगी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी वैभव लोंढे, माजी नगराध्यक्ष कैलास सदाफळ, नगरसेवक प्रवीण सदाफळ, दशरथ तुपे, ॲड.मयूर पाळंदे, शशिकांत लोळगे, नितीन गाडेकर, प्रभाकर आरणे, सुयोग शेळके, अरुण गाडेकर, रमणलालजी रुणवाल,गोटूशेठ राईसोनी, उद्योजक प्रफुलजी पिपाडा, उद्योजक राजेशजी भन्साळी, पारसजी धाडीवाल, प्रवीणजी डुंगरवाल, नंदलालजी डुंगरवाल, महावीरजी पिपाडा, मनोजजी पिपाडा, गोपी पिपाडा, चेतन रुणवाल,अभय रुणवाल, कमलेश रुणवाल, अजीत धाड़ीवाल ,सचिन अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते

# युडीआयडी सक्तीवर प्रहार संघटनेची टीका; निर्णयामुळे दिव्यांगांना फटका : मधुकर घाडगे

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**राहुरी :** दिव्यांग मंत्रालयाचे सचिव म्हणून कार्यरत असताना तुकाराम मुंढे यांनी घेतलेल्या काही निर्णयांवर प्रहार दिव्यांग क्राती संघटनेने टीका केली आहे. बोगस दिव्यांग व बोगस संस्थांवर कारवाई करणे हा प्रशासकीय दृष्ट्या योग्य निर्णय असला, तरी युडीआयडी (णूखृ) कार्ड सक्तीचे करणे आणि आधार लिंक नसल्यास योजना बंद करण्याचा निर्णय हा दिव्यांगांसाठी अन्यायकारक ठरत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

संघटनेचे उत्तर अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे यांनी सांगितले की, राज्यातील अनेक दिव्यांग व्यक्तींना अद्यापही आवश्यक प्रमाणपत्रे मिळालेली नाहीत. सुमारे २० टक्के दिव्यांगांकडे आजही प्रमाणपत्र नाही, तर जवळपास ३० टक्के दिव्यांगांकडे ऑनलाइन नोंदणी असूनही प्रत्यक्ष युडीआयडी कार्ड उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत योजना बंद करण्याचा निर्णय घेतल्याने हजारो दिव्यांग लाभांपासून वंचित राहणार आहेत.



विशेषतः संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या सुमारे ४८ हजार दिव्यांगांवर या निर्णयाचा परिणाम होणार असल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. जिल्हा स्तरावरील सिव्हिल हॉस्पिटलमार्फत वेळेत प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे दिव्यांगांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, बोगस प्रमाणपत्रांच्या प्रकरणात संबंधित डॉक्टरांवर कारवाई न झाल्याबद्दलही संघटनेने नाराजी व्यक्त केली आहे. बोगस लाभार्थ्यांवर कारवाई झाली, मात्र त्यांना प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई का झाली नाही? असा सवाल घाडगे यांनी उपस्थित केला. तुकाराम मुंढे यांची बदली हा प्रशासकीय विषय असून, त्यांच्या बदलीबाबत प्रहार दिव्यांग क्रांती संघटना कोणतेही आंदोलन किंवा निवेदन देणार नसल्याचेही घाडगे यांनी स्पष्ट केले.

# राहुरी पोटनिवडणुकीसाठी भाजपकडून अक्षय कर्डिले यांना उमेदवारी जाहीर; कार्यकर्त्यांचा जल्लोष

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**राहुरी :** राहुरी प्रतिनिधी, गेल्या अनेक वर्षापासून स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांनी रक्ताचे पाणि करुन एक एक माणूस जोडण्याचे काम केले. त्यांच्या आर्शिवादाने आज एवढी माणसे माझ्या पाठीशी आहेत. त्यामुळेच मला भाजपाकडून उमेदवारी मिळाली. असे प्रतिपादन युवानेते अक्षय कर्डिले यांनी व्यक्त केले.

राहुरी, नगर, पाथर्डी मतदार संघाची पोट निवडणूक २३ एप्रिल रोजी होत आहे. निवडणूक तोंडावर येऊन ठेपली होती तरी भाजपाकडून उमेदवार घोषित झाला नव्हता. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमावस्था



निर्माण झाली होती. सदर निवडणूकीसाठी भाजपाकडून आज युवानेते यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. या निमित्त दि. १ एप्रिल २०२६ रोजी स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या राहुरी येथील संपर्क कार्यालया समोर कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी व पेढे वाटप करून आनंदोत्सव साजरा केला.

प्रसंगी अमोल भनगडे म्हणाले कि, तळा गाळातील कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेत आज भाजपाकडून राहुरी, नगर, पाथर्डी मतदार संघातील पोट निवडणूकीसाठी युवानेते अक्षय कर्डिले यांचे नाव अधिकृत घोषित करण्यात आले. येणाऱ्या निवडणुकीत अक्षय कर्डिले यांचा विजय आजच निश्चित झाला. असे मत भनगडे यांनी व्यक्त केले. या निवडणुकीत युवानेते अक्षय कर्डिले हे भरघोस मतांनी विजय होणार असा विश्वास यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रकाश पारख, रविंद्र म्हसे, राजेंद्र दरक, गणेश खैरे, सतिष फुलसौंदर, सचिन मेहेत्रे, राजेंद्र गोपाळे, युवराज गाडे, किशोर येवले, उमेश शेळके, कुलदिप पवार, दिपक वाबळे, सुभाष गायकवाड, सुनिल पवार, शिवाजी डौले, अण्णासाहेब बाचकर, प्रतिक बोबडे, नयन शिंगी, कांतीलाल जगधने, अक्षय भूजाडी आदिंसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# थोरांदळेत हनुमान जयंती निमित्त पुरी गुळवणीच्या महाप्रसादाची परंपरा आजही कायम

## चार लाख पुरी, पाच पिंप गुळवणी, तीनशे किलो कांद्याची चटणी ; श्री हनुमान जयंतीचा महाप्रसाद तयार

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**निरगुडसर :** पाच पिंप गुळवणी, तीन लाखाहून अधिक पुऱ्या, तीनशे किलो कांद्याची चटणी हा महाप्रसाद बनवला जातोय आंबेगाव तालुक्यातील थोरांदळे गावात निमित्त आहे. श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा, उत्तर पुणे जिल्हातील सर्वात मोठ्या हनुमान जन्मोत्सवासाठी येणाऱ्या भाविकांसाठी गावातील साडेतीनशे कुटुंबातील महिला पुऱ्या लाटण्याचे तर पुरुष पुऱ्या तळण्याचे काम करतात ही पिढी जात महाप्रसाद बनवायची परंपरा आजही मोठ्या उत्साहात सुरू आहे.

थोरांदळे (ता. आंबेगाव) येथील ग्रामस्थ दरवर्षीप्रमाणे शिवकालीन ऐतिहासिक वारसा लाभलेल्या आपल्या जागृत श्री हनुमान जन्मसोहळा साजरा करून भाविकांना पुरी, गुळवणी व कांद्याची चटणी या महाप्रसादाचा आस्वाद देत असतात, आपल्या जागृत श्रीहनुमानचा जन्म सोहळाचा महाप्रसाद बनवण्यासाठी तरुणापासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वजण मोठ्या उत्साहात सहभागी होतात, यासाठी प्रत्येक कुटुंबातून गहू, कांदा आदी साहित्य घेऊन येऊन हा महाप्रसाद तयार केला जातो. बुधवार दि. १ रोजी गावातील साडेतीनशे कुटुंबातील महिलांनी गावात एकत्र येऊन पुऱ्या लाटण्याचे काम केले. पुरुषांनी पुऱ्या तळण्याचे, कांदा कापण्याचे काम केले, गावातील कोणीही मागे राहत नव्हते सर्व कामात व्यस्त होते. श्रीहनुमान जन्मोत्सव गुरुवार दि.२ रोजी साजरा होत असून पहाटे ह.भ.प. विलास महाराज मिंडे यांचे हनुमान जन्माचे किर्तन होणार असून आलेल्या भक्तांना पुरी व गुळवणीचा महाप्रसाद देण्यात येईल, त्यानंतर बैलगाडा शर्यती पार पडणार आहेत. तसेच शुक्रवारी संध्याकाळी संध्या पाटील यांचा करमणुकीचा कार्यक्रम पार पडणार आहे.



# आपल्यातील टॅलेंट समोरच्या व्यक्तीला दाखवू नका ते आपोआपच कळून येईल

आपल्या व्यक्तीमत्वाच्या छटा अनेक आहेत. त्यांचा विचार करता त्यातला एखादा पैलू अतिशय मौल्यवान असतो. हा पैलू स्वत:ला कधीच समजत नाही म्हणून आपण त्या दृष्टीने विचार करणे उपकारक आहे. आयुष्यात योग्यवेळी जर आपल्यातील उणिवा आणि जमेची बाजू कळली तर आयुष्याला एक वेगळ्या प्रकारची चकाकी येऊ शकते, आपल्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव इतरांवर पडावा असे जर वाटत असेल तर, यथासांग आयुष्याच्या वळणावर आपल्यातील अतिशय चांगल्या प्रकारचा जो गुण आहे त्याला विचारात न घेता आपल्यातील वाईट गुण जो आहे तो सुधारण्याचा प्रयत्न करावा. यामुळे इतरांवर आपला प्रभाव पडावा या विचाराने प्रेरित न होता, आपल्यातील उणिवा दूर केल्यास एक चांगले व्यक्तीमत्व उभारु शकेल, आणि यामुळे प्रकर्षाने आपल्या प्रगतीच्या वाटा आपल्यासाठी सदैव मोकळ्या राहतील. कारण वाईट गोष्ट दूर केल्यानंतर चांगल्या प्रकारचे व्यक्तीमत्व निर्माण होईल. आणि समाजाला अशा व्यक्तीमत्वाचा हेवा नेहमीच वाटतो, आणि चांगल्या व्यक्तीमत्वाच्या व्यक्तीच्या भोवती



नेहमी गराडा आणि गर्दी असते. म्हणून आपण इतरांच्या ह्रदयावर मनोराज्य गाजवायचे असेल तर आपल्या भाषेवर नियंत्रण असायला हवे. त्यामध्ये शब्दांचा वापर प्रामुख्याने टाळणे हितकारक असते. त्याचबरोबर आपल्या राहणीमानात देखील बदल करणे गरजेचे असते. काही क्षण औचित्य राखून वागणे हे सुद्धा गरजेचे असते. म्हणून प्रत्येक व्यक्तीने आपल्या राहणीमानाचा,वागण्याचा,शिष्टाचाराचा जो भाग आहे तो अतिशय चांगल्या रितीने जोपासायला हवा. हे जर झाले नाही तर आपले व्यक्तीमत्व समाजमान्य होऊ शकत नाही.

जगात जे जे कोणी मोठे उच्च पदस्थ झाले त्यांची चरित्रे काढून वाचल्यास आपणाला त्यांच्यातील चांगल्या गुणांचीच ओळख होईल म्हणून त्यांच्याप्रमाणे आपले चरित्र निर्माण व्हावे असे जर वाटत असेल तर त्यातल्या चांगल्या गुणांचा स्वीकार करुन त्या पद्धतीने अनुकरण करण्याचा प्रयत्न करावा तरच ते शक्य आहे.

प्रत्येकालाच वाटत असते की, आपल्याला सर्वांनीच पसंत करावे. आपली प्रशंसा ऐकणे कुणाला आवडणार नाही ? सौंदर्याच्या बाबतीत बोलायचे झाले, तर ते दोन प्रकारचे असते. आंतरिक आणि बाह्य.

बाह्य सौंदर्य काही काळापर्यंत आकर्षून घेऊ शकेल, पण आंतरिक सौंदर्य नेहमीच दुसऱ्यांच्या ह्रदयाला मोहित करते आणि आपली चांगली छाप पाडते. मात्र, हे सौंदर्य प्राप्त करुन घेण्यासाठी स्वत: प्रयत्न करायला हवेत.

- दुसऱ्यांसमोर स्वत:च स्वत:ची स्तुती करु नका, आपल्यातील टॅलेंट समोरच्या व्यक्तीला आपोआप कळून येईल.
- आपल्या मित्रमंडळींसाठी, नातेवाईक आणि परिचितांसाठी जरुर वेळ काढा, आपण जितके महत्व नव्या मित्रांना देता, तितकेच ते जुन्या मित्रांनाही द्या.
- आपल्या मित्र-आप्तेष्टांच्या सुखदु:खात नेहमी सामील व्हा आणि आपल्या सुखदु:खात त्यांचाही समावेश करा.
- घरकाम करणारे नोकर, दूधवाला, पेप-रवाला, माळी यांचेही म्हणणे ऐकून घ्या. त्यांना केवळ नोकर न समजता एक माणूस म्हणून त्यांच्याशी वागा. त्यांच्या अडीअडचणी समजावून घ्या. त्यांच्या आजारपणाकडे लक्ष द्या.
- काही वेळ समाजसेवा करण्यासाठी खर्च करा. जसे की, प्रौढ शिक्षण, पर्यावरण व स्वच्छता वगैरे वगैर.
- आपल्या समवयस्क आणि सहकाऱ्या समवेत सौजन्याने वागा. त्यांच्या मदतीसाठी तत्पर राहा.
- आपल्यावर विश्वास ठेवून, एखाद्याने त्याचे गुपित तुमच्यासमोर उघड केले असेल, तर ते दुसऱ्याला सांगता कामा नये.
- आपला मौल्यवान वेळ खोटे बोलण्यात किंवा दुसऱ्याची तक्रार करण्यात घालवू नका, उलट रिकाम्या वेळेचा सदुपयोग करा.
- नेहमी हसत-खेळत राहा. पाहुणे घरी येताच किंवा फोनवरुन बोलताना आपल्या आवाजातून गोडवा आणि आनंद व्यक्त व्हायला हवा, जेणेकरुन समोरच्याला वाटावे की, त्यांच्याशी भेटून किंवा त्यांच्याशी बोलून तुम्हाला खरोखरच आनंद झालाय.
- आपल्यावर कुणी नाराज झाले असेल, तर पहिल्यांदा त्यामागील कारण शोधा आणि यात आपलीच चूक असल्याचे आढळून येताच तात्काळ सारे गैरसमज दूर करुन टाका. आपल्या अहंकाराला फाटा देऊन त्यांची माफी मागा.

●●●

# परदेशात जाणाऱ्या स्त्रियांची वाढती संख्या



ज्या देशात पुरुषप्रधान संस्कृती आहे आणि महिलांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते वा छळ केला जातो अशा देशांतील स्त्रिया आता सीमापार जाऊन परदेशात नोकरी करू लागल्या आहेत. त्या आया, दाया, स्वयंपाकीण, मोलकरीण बनून परदेशात जाऊ पाहताहेत.

भारत, पाकिस्तान, मलेशिया, नेपाळ, बांगलादेश व फिलीपिन्स येथील अल्पशिक्षित स्त्रिया परदेशात मोलकरीण बनून जायला तयार असतात. 'समाजातील किंवा देशातली मुल्यं जशी बदलत आहेत किंवा जसजसा सांस्कृतिक बदल होतो आहे, तशा देशाच्या सीमा ओलांडून परदेशात जाणाऱ्या स्त्रियांची संख्याही वाढत आहे. शिक्षणानेही परदेशी वारीची द्वारे उघडी केली आहेत.

असे मत संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या पाहणीत व्यक्त केले आहे. देश सोडणाऱ्या महिलांच्या बाबतीत त्यांच्या देशातील सामाजिक परिस्थिती व परंपरा कारणीभूत आहे, असं राष्ट्रसंघाने अहवालात नमूद केले. या स्त्रियांना परदेशातील लठ्ठ पगाराचे आकर्षणही असते. आता जेवढे पुरुष परदेशी जातात तेवढ्या स्त्रियांही जात आहेत. त्यात मोलकरणींची संख्या लक्षणीय असते. या स्त्रियांमळे संस्कृतीची देवाणघेवाणही घडत आहे. स्त्रियांचं विश्व त्यामुळे समृध्द होत आहे, असे संयुक्त राष्ट्रसंघ आपल्या अहवालात म्हणतो.

# नियोजन पध्दतीने गेल्यास संसार सुखाचा होऊ शकतो

प्रत्येक व्यक्ती सुखाच्या पाठी धावत असताना आपल्या मनातील असणाऱ्या विचाराचे स्थान पूर्णपणे विसरुन जात आहे. आणि यामुळे संसारात करावी लागणारी तडजोड कोणत्या प्रकारे करावी व कशी करावी याचे नियोजन पूर्णपणे विसरले जाते आहे, तेव्हा प्रत्येक व्यक्तीने आपल्या संसारात मॅनेजमेंट करुन कोणत्या प्रकारे हा संसार चांगल्या रितीने फुलविता येईल, त्यास बहर येईल अशा रितीने आपण कोणतीही संसारीक गोष्ट करताना त्या अगोदर त्याचे पूर्व नियोजन करणे गरजेचे असते. मात्र, पती-पत्नींनी एकमेकांना विश्वासात घेऊन आपण अशा प्रकारचे नियोजन करु या का ? अशी विचारणा एकमेकांनी एकमेकास केल्यास आणि त्यातून आपले इतर बजेट कुठे फेल तरी जाणार नाही ना ? याचा विचार करुन एकमेकांनी जर प्रश्न सोडविले तर ही अडजेस्टमेंट खूप चांगल्या प्रकारे आपल्या संसारास बळकटी देऊ शकेल.

प्रत्येक बाब ही आपले मॅनेजमेंट स्कील वापरुन केल्यास त्याच्यामध्ये बळकटी येऊ शकते. अन्यथा आपल्या संसार प्रपंचामध्ये कुठेतरी प्रगतीला खीळ घालण्यासारखे होऊ शकेल. योग्य वेळी योग्य नियोजन



आणि त्यासाठी योग्य कृती हीच गरज असते. म्हणून जीवन जगत असताना संसाराच्या जगात आपण आपल्या पद्धतीने मॅनेजमेंट करुन गरजेचेच असते. ते जर नाही झाले तर इतरांच्या दृष्टीने, शेजार पाजाऱ्यांच्या दृष्टीने, मित्र परिवाराच्या दृष्टीने नातेवाईकांच्या दृष्टीने आपण अतिशय कमकुवत आहोत असे संबोधले जाते. यामुळे विचारी मनाला एक समज देऊन चांगल्या प्रकारचे नियोजन आखून, नियोजनबद्ध पद्धतीने गेल्यास संसार सुखाचा होऊ शकतो.

माणसाचे जीवन लग्नानंतर खूप बदलते. अशा वेळी जीवनात स्पार्क राखण्यासाठी उभयतांनी प्रयत्न करायला हवेत. या कामासाठी गरज असते ती मॅनेजमेंट स्किलची. जर आपण लग्नाबाबत गांभिर्याने विचार करीत असाल तर आपल्याला फ्युचर प्लॅनिंगही करावे लागेल. जर आपण लग्नापूर्वीच वैयक्तिक व कौटुंबिक स्तरावर आर्थिक नियोजन केले, तर भविष्यात आपल्याला त्याचा खूपच आधार मिळेल.

जर आपण सर्व माहित असूनही भावी स्थितीबाबत अज्ञानी राहाल तर सुखी संसाराचे त्रासात रुपांतर व्हायला वेळ लागणार नाही. लग्नापूर्वी उभयतांनी एकमेकांची लाईफ स्टाईल व खर्चाविषयी संपूर्ण माहिती घ्यायला हवी.

आपल्याला लग्नापूर्वीच आपले व आपल्या जोडीदाराचे एकत्रित उत्पन्न किती असेल आणि त्याचे खर्च किती असतील हे जाणून घ्यायला हवे. आपण उधळे आहात की काटकसरी हे आपल्या पार्टनरला सांगायला हवे. त्यानंतर आपले पक्के उत्पन्न किती आहे हे ही जाणून घ्या. कित्येकजण आपल्या पत्नीला कित्येक वर्षे आपले मासिक उत्पन्न किती आहे हे ही सांगत नाहीत.

# आई हीच खरी हितचिंतक, संरक्षक व मैत्रीण असते

मुलीच्या अडचणी व महत्त्वाकांक्षा जाणा. तिचे मन चाचपडण्याचा प्रयत्न करा. तिला चांगल्या - वाईट गोष्टी समजाव्यात. तिला आज्ञा नव्हे सल्ला द्या. तिची मैत्रिण होऊन तिच्या जीवन शैलीतील पैलू समजावून सांगा.

क्षुल्लक गोष्टींवरून मुलीला रागावणे, अपमानित करणे तिला बंडखोर बनवू शकते. तिच्याशी मनमोकळ्या गप्पा मारा. बोलण्याचा टोन रागावण्याचा न राखता सहज चर्चेचा राखा. जर एखाद्या बाबीत वैचारिक मतभेद झाला तर मधला मार्ग वापरून तडजोड करा. मुलगी किशोरवयीन झाल्यानंतर बऱ्याचदा तिच्या आईशी असलेल्या नात्यात बऱ्याचदा दुरावा निर्माण होऊ लागतो. त्या एकमेकींबाबत साशंक होऊ लागतात. आई - मुलीचे नाते गोड राहण्यासाठी दोघींनी आपल्या वागण्यात काही गोष्टींकडे लक्ष द्यायला हवे.



घरातील वातावरण बोअर झाल्यास मुलगी भरकटण्याची भीती वाढते. या वयात ती आपले विचार, अनुभव व आवडी एखाद्याशी शेअर करू इच्छित असते. आपल्या मुलीशी नवा चित्रपट, टी.व्ही. मालिका, नव्या वस्तू, रोचक बातम्या, गृह सजावट, नवी रेसिपी, एखाद्याचे वागणे इ. विषयी भरपूर गप्पा मारा. यामुळे ती बोअर होणार नाही.

आपली मुलगी, तिचे मत आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याची जाणीव तिला द्या. खरेदी-साठी तिला सोबत न्या.

आई हीच खरी हितचिंतक, संरक्षक व मैत्रीण असते. आपल्या आईमध्ये विश्वास जागवा व तिच्या विचारांचा आदर करा.

आईइतके मुलीला कोणी समजू शकत नसते. ती स्वत: स्त्री असल्याने तिला मुलीला होणाऱ्या त्रासांची जाणीव असते. प्रत्येक आई आपल्या मुलीला यशस्वी व सुखी पाहू इच्छित असते. तिने मुलांपेक्षा जास्त जग पाहिलेले असते. त्यामुळे तिला जीवनातील कटू गोड पैलूंचा मुलीपेक्षा जास्त अनुभव असतो. आईची प्रत्येक गोष्ट अडचण समजू नका, जर आई आपल्या वेळी अवेळी बाहेर जाण्यास वा उशिरा घरी परतल्यास आक्षेप घेत असेल तर ते आपल्या हिताचेच असते.

हल्ली विवाहपूर्व यौनसंबंध अत्यंत किरकोळ मानले जात आहेत. दररोज अयशस्वी प्रेम, फसव्या प्रेमामुळे आत्महत्या व हत्येच्या बातम्या वाचायला मिळतात. अशावेळी आपल्या खऱ्या हितचिंतक आईला चिंता वाटणे स्वाभाविक असते. तिची चिंता आपला विचार सांगून दूर करा. आपल्या मुलीला चांगले - वाईट, योग्य - अयोग्य याची जाण आहे असे तिला वाटू लागले तर ती स्वत:च आपल्यावर बंधने घालणे सोडून देईल.

■■■

# एखाद्या तरूणाला आपल्या ह्रदयात स्थान देताना...



सुखी, समाधानी वैवाहिक जीवनासाठी आजच्या जमान्यात योग्य जोडीदाराची निवड करण्याचा असा कोणता फॉर्म्यूला असू शकतो, ज्याचा वापर करून आपण आपल्यासाठी योग्य जोडीदाराची निवड करून अभिमानाने जगू शकतो, चला, जाणून घेऊ या !

आजच्या काळात आपण टीव्ही, रेडिओ, वृत्तपत्रांमधून लव्हगुरूंचा डेटिंग आणि विवाहविषयक सल्ला ऐकतो आणि वाचतोही ! पण अमेरिकेची फर्स्ट लेडी मिशेल ओबामा यांनी या संदर्भात युवा वर्गासाठी दिलेल्या टिप्स निश्चितपणे महत्वाच्या ठरू शकतात. मिळालेल्या ताज्या माहितीनुसार लेडी मिशेल ओबामा म्हणतात की,

♦ एखाद्या तरूणाला आपल्या ह्रदयात स्थान देताना आणि त्याला आपलेसे बनविताना त्याच्या चेहरेपट्टीवर अजिबात जाऊ नये.

♦ लुक्स पुढे जाऊनही पाहावे आणि केवळ अशा तरूणासोबत वैवाहिक जीवन जगण्याचा निर्णय घ्यावा, ज्याचे मन चांगले असेल.

♦ जीवनसाथी आकर्षक असावा हे मान्य आहे; पण या गोष्टीचाही गांभिर्याने विचार करायला हवाय की, आकर्षणाची जादू तर केवळ काही काळापर्यंतच राहील पुढे काय ?

♦ एक माणूस म्हणून तो तरूण कसा आहे ? याच गोष्टीला अर्थ आहे.

♦ आपल्याला आवडलेल्या तरूणाचा सुंदर चेहरा, त्याचा बँक बॅलन्स, त्याची संपत्ती किंवा त्याच्या नावावर न जाता त्याचे मन पाहावे, त्याचा आत्मा ओळखावा.

♦ इथे एक गोष्ट विशेष नमूद करावीशी वाटते ती अशी की, जगभरातल्या तरूणींना जोडीदाराची निवड करण्याविषयीचा सल्ला देणाऱ्या मिशेल यांनी आजचे प्रेसिडेंट ऑफ अमेरिका बराक ओबामा यांच्यासोबत वैवाहिक जीवनाची १७ वर्षे आनंदात घालवली आहेत. एका सर्वेक्षणानुसार, एका सर्वसामान्य अमेरिकन मनुष्याच्या वैवाहिक जीवनाचे आयुष्य सरासरी ११ वर्षे आहे. अशा परिस्थितीत हे उदाहरण खरोखरच एक अपवाद ठरते. आहे की नाही विशेष .

दोन मुलींची माता असणाऱ्या ४५ वर्षीय मिशेल पुढे म्हणतात, ज्याला आपल्या आनंदाची पर्वा नसेल असा मनुष्य काय कामाचा ?

♦ जरा विचार करा की, सुंदर चेहरेपट्टी असणारा तरूण आपल्याला किती काळपर्यंत खूष ठेवू शकेल ? तो दिसायला सुंदर आहे; पण आपल्याला आनंद मिळवून देण्यासाठी काहीच प्रयत्न करत नाही मग, अशा देखणेपणाचा काय उपयोग ?

♦ स्त्रियांविषयी त्याचे नेमके कोणते विचार आहेत, हे जाणून घ्या. स्त्रियांविषयी त्याच्या मनात आदरभाव आहे का ?

♦ स्त्रियांना तो पुरूषांच्या तुलनेत कमी समजत असेल, तर अशा देखण्या-चेहऱ्याच्या मनुष्यापासून दूर राहिलेलेच बरे ! असा मनुष्य आपल्याला कधीच खूष ठेवणार नाही.

♦ मुलांविषयी किंवा त्यांच्या भविष्याविषयी त्याचे काय मत आहे ?

♦ इतरांच्या मुलांसोबत तो कशा पद्धतीने वागतो ? तो मुलांमध्ये जाऊन मिसळतो का ? त्यांच्यासोबत हसता-खेळताना त्यालाही आनंद होतो का ?

♦ कुटुंबाविषयीची त्याला किती ओढ आहे ?

♦ कौटुंबिक समस्या सोडविण्याकडे त्याचा कल असतो की कौटुंबिक कलह वाढवण्याकडे, याकडेही बारकाईने पाहिले पाहिजे.

♦ तो त्याच्या घरात घरातील इतर सदस्यांशी मनमोकळेपणाने वागतो किंवा नाही, हेही पाहाणे तितकेच गरजेचे आहे.

# घरच्या घरी वाढवा चेहऱ्याचे सौंदर्य

इतरांपेक्षा आपले सौंदर्य उठून दिसावे, ही प्रत्येक स्त्री-पुरुषाची मनस्वी इच्छा असते. त्यासाठी कायम महागड्या सौंदर्यप्रसाधनांचा अवलंब अथवा हायटेक ब्युटी पार्लरचा रस्ता धरला जातो. परंतु घरातील उपलब्ध साधनसामग्रीपासून त्वचा संगोपन करता येते. त्वचेचे पोषण करणारे अनेक उपाय घरगुती साहित्यांपासून करता येतात.

**मसूर दाळ पीठ :** कोरड्या त्वचेसाठी मसुरीच्या डाळीचे पीठ करून चेहऱ्यावर १५ मिनिटे लावावे. त्वचा स्वच्छ होऊन चकाकी येते. १५ ते २० मिनिटांनी चेहरा थंड पाण्याने धुवावा.

**बेसन पीठ :** तेलकट त्वचेचा तेलकटपणा जाण्यासाठी दुधात बेसन पीठ कालवून २० मिनिटे चेहरा, गळा व मानेवर लेप करावा. थंड पाण्याने धुवावा. रंध्रे मोकळी होतील.



**लिंबू :** कापसाच्या बोळ्याने हा रस गुलाब पाणी, काकडीचा रस समप्रमाणात घेऊन चेहऱ्याला लावावा. यामुळे काळे डाग व मुरुमे कमी होण्यास मदत होते.

**काकडी :** काकडीचा रस काढून तो चेहरा व काळसर असणाऱ्या शरीरावर लाव-ावा. १५ मिनिटे ठेवून साध्या पाण्याने धुवावा. चेह-यावरील मुरुमांचे डाग यामुळे जातात.

**टोमॅटो :** लालभडक टोमॅटोचा गर चेहऱ्याला व मानेला लावून तासाच्या अवधीने कोमट पाण्याने चेहरा धुवावा. छोटे मोठे त्वचा दोष नाहीसे होऊन चेहरा उजळ होण्यास याने मदत होते.

**दही :** दही हे एक प्रकारचे नैसर्गिक क्लिंजर व मॉयश्चरायझर आहे. रोज १० मिनिटे चेहऱ्याला दही लावावे. दहा मिनिटांनी कोमट पाण्याने चेहरा धुवून घ्यावा. त्वचा टवटवीत होते.

**मध :** दररोज किमान १५ दिवस चेहऱ्याला लावून थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवावा. १५ मिनिटे चेहऱ्यावर ठेवावे. यामुळे त्वचा स्वच्छ होऊन रंध्रे मोकळी होतात.

**घरगुती उपाय बहुगुणी** - घरातल्या घरात उपलब्ध सामग्रीपासूनही बोच फेस पॅक करता येतात. त्यामुळे फरकही पडतो. शिवाय शक्य असल्यास फळांचा गर, कोरफडीच्या गराचा पॅक अत्यंत प्रभावशाली असतो. तीन महिन्यांतून एकदा हा पॅक लावला तरी दीर्घकाळ त्वचा सुस्थितीत राहते. टवटवीतपणा येतो.

# बहुसंख्य स्त्रियांची कामोत्तेजना चौथ्या स्तरावर होते

'प्रणय' हे एक शास्त्र आहे. चीनमधील तैवोझम प्रमाणे याची तितकीच मूलभूत गरज आहे. दोन्हींमध्ये ऐक्य निर्माण करुन आध्यात्मिक आनंदाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी स्त्री व पुरुषांच्या उर्जेत समतोल राखण्यात येतो.

जीवनातील प्रत्येक घटकाचा शोध घेण्यास प्रणयामुळे प्रत्येकाला प्रेरणा मिळते. म्हणून लैंगिकतेच्या अभ्यासाचा केवळ समावेश करण्यात आलेला नाही, तर त्याचा आदरही केला जातो. वास्तविक पाहता, प्रणयक्रीडा ही नैसर्गिक देणगी आहे. त्यामुळे मनोवृत्ती दडपून टाकणे किंवा अपराधीपणाची भावना या दोन्ही गोष्टी 'सेक्स'ला जोडल्या जाऊ शकत नाहीत. जेव्हा एखादी व्यक्ती आपल्या प्रिय व्यक्तीला भेटते, तेव्हा मंदिरात जाताना मनात जशी पवित्र भावना असते, तशी पवित्र भावना त्यावेळी असते.

लैंगिक प्रेमाची कला ही अभ्यासासाठी उदात्त केली आहे. प्राचीन भारतातील तरुण म्हणून तुम्ही मंदिरात जाऊ शकता व तेथे प्रणयक्रीडा शिकू शकता, आज लैंगिकतेचा अभ्यास हा पाश्चिमात्य मॉडेल्सवर आधारित आहे, तर तंत्र विद्येची परंपरा ही सुमारे ५ हजार वर्षांपूर्वीपासूनची आहे. त्यामुळे आपण आपल्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी त्या अमूल्य खजिन्यातून ज्ञानाची संपत्ती घेतली पाहिजे.



प्रणयक्रीडेच्या तंत्रामध्ये तुम्ही आणखी ३ प्रमुख भागांचा समावेश करु शकता..

* नॉर्मल सेक्सपेक्षा प्रणयक्रीडेला आनंद व सुखाची उच्च स्थिती गाठणे शक्य होते.

* तुमच्या जोडीदारावर भरपूर प्रेम करा. त्यामुळे प्रणयक्रीडेत किती खोल भावना आहेत हे दिसून येते.

* तुम्ही प्रणयक्रीडेत पावित्र्याचा अनुभव घेत असता. शरीर, मन, अंत:करण व आत्म्याच्या पातळीवर त्याची प्रचिती येते. पवित्र सेक्स कसे असतो, याची शिकवण तुम्हाला मिळते.

* प्रणयक्रीडेचा आनंद पुरुष वाढवू शकतात, त्याचा विस्तार करु शकतात आणि त्याचवेळी प्रणयक्रीडेचा कालावधी वाढवू शकतात. त्यामुळे जोडीदार प्रणयाची चरमसीमा गाठू शकतो. प्रणयक्रीडेचा परमोच्च बिंदू गाठल्यावर ती ऊर्जा संपूर्ण शरीरभर संचारण्यास वाव दिला पाहिजे. बहुसंख्य लोक नियंत्रण ठेवू शकतात. म्हणजे कामक्रीडेचा अत्युच्च आनंदाचा अनुभव घेता येतो. वीर्यसख्खलनावर नियंत्रण ठेवणे हे इतर कौशल्याप्रमाणे एक कौशल्य आहे.

'ताओइस्ट' मध्ये ते म्हणतात, स्त्री ही पाण्यासारखी व पुरुष अग्नीप्रमाणे आहे. सहसा नेहमी असे घडते की, आग विझविण्यासाठी त्यावर पाणी टाकले जाते. त्यामुळे पुरुष थकतो व स्त्रीला नैराश्य येते.

ते पुढे म्हणतात, स्त्रियांच्या कामवासना उत्तेजित होण्याचे एकूण ९ स्तर आहेत. त्यामुळे तिची आध्यात्मिक ऊर्जा पूर्णपणे जागृत होते. बहुसंख्य स्त्रियांची कामोत्तेजना चौथ्या स्तरावर होते.

त्याचवेळी पुरुषाचे वीर्यसख्खलन होते. त्यामुळे उर्वरित ५ स्तर स्त्री गाठू शकत नाही. त्यासाठी वीर्यसख्खलन कौशल्य आत्मसात केल्यास उर्वरित पाचही स्तर गाठून आनंदाचा परमोच्च बिंदू अनुभवणे शक्य होईल.

# तुम्ही पूर्ण दिवस न बोलता शांत राहिल्यास शरीरात नेमके काय बदल होतात?

अनेकदा रोजच्या धावपळीपासून दूर गडबड-गोंधळ नसेल अशा ठिकाणी जाऊन शांतपणे बसण्याची इच्छा होते. कोणाशीही न बोलता गप्प राहावेसे वाटते. मौन ही आपल्या आरोग्यासाठी सर्वोत्तम गोष्ट मानली जाते. जास्त बोलल्याने लोकांना तुमचा त्रास होतोच आणि तुमची शारीरिक ऊर्जाही कमी होते. अनेकदा लोकांना काम करताना बोलायची सवय असते मग ते घरी असो किंवा ऑफिसमध्ये. कधी कधी खूप बोलणे म्हणजे मन भरकटवण्यासारखे असते, पण काही लोक असे असतात जे दिवसभर बोलत राहतात.

तुम्ही कधी विचार केला आहे का की तुम्ही दिवसभर गप्प राहिल्यास तुमच्या आरोग्यावर काय परिणाम होईल? याच संदर्भात बोलताना मुंबईतील कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटलचे सल्लागार मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शौनक अजिंक्य यांनी सविस्तर उत्तर दिले आहे.

डॉ. शौनक अजिंक्य यांच्या मते, दिवसभर शांत राहण्याच्या या प्रक्रियेला स्पीच फास्टिंग असे म्हणतात. यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर प्रभाव पडत असतो.

**स्पीच फास्टिंगचे फायदे**

**ताण, थकवा होतो कमी :** स्पीच फास्टिंगमुळे तुमच्या व्होकल कॉर्ड्सना आराम मिळतो. त्यामुळे ताण आणि थकवा कमी होतो. विशेषत: ज्यांना कामनिमित्त सतत बोलावे लागते त्यांच्यासाठी ही फायदेशीर गोष्ट असते. एक दिवस शांत राहिल्याने कॉर्टिसोलसारख्या तणावाच्या हार्मोनमध्ये घट होऊ शकते आणि परिणामत: विश्रांती व चांगली झोप लागू शकते.



**संवाद कौशल्य सुधारू शकता :** शांत राहिल्याने आत्मनिरीक्षण करता येते आणि स्वत:बद्दल अधिक जाणून घेऊ शकता. तुम्ही इतरांचे अधिक लक्षपूर्वक ऐकता. त्यामुळे तुमच्या विचारात भर पडते. अशा प्रकारे तुम्ही तुमचे संभाषण कौशल्य सुधारू शकता.

**आध्यात्मिक जोडणी :** अनेक धर्मांमध्ये आध्यात्मिक गोष्टींमध्ये मौन ठेवण्यास खूप महत्त्व देण्यात आले आहे. शांत राहून तुम्ही तुमच्या अंतरंगाशी किंवा मनाशी एकरुप होऊ शकता.

दिवसभर शांत राहिल्याने तुमच्या शरीरात काय बदल दिसून येतात?

**शारीरिक विश्रांती :** दिवसभर शांत राहिल्याने शारीरिक विश्रांतीही मिळते. मग त्यामुळे तुमच्या व्होकल कॉर्ड्स, घशाचे स्नायू व अगदी चेहऱ्याच्या स्नायूंनाही आराम मिळतो. यादरम्यान नैसर्गिक पद्धतीने तुम्ही सखोल श्वास घेऊ शकता. त्यादरम्यान खूप शांत, मोकळे वाटते. संभाव्यतः रक्तदाब आणि हृदयाची गती कमी होते.

**एकाग्रता वाढते :** दिवसभर शांत राहिल्याने मनाची चंचलता कमी होऊन, तुमचे मन एखाद्या स्पष्ट असलेल्या विषयावर अधिक क्षमतेने केंद्रित करणे शक्य होते. त्यामुळे तुम्ही स्वत:सह इतरांशी अधिक चांगल्या प्रकारे जुळवून घेऊ शकता. त्यामुळे कर्तव्यभावना वाढू शकते.

**दिवसभर शांत राहणे कोणी टाळावे?**

दिवसभर शांत राहणे अनेकांसाठी फायदेशीर ठरू शकते; परंतु प्रत्येकासाठी हा उपाय योग्य नाही. डॉ. अजिंक्य यांनी काही अटींसह सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे.

**व्होकल कॉर्ड डिसऑर्डर किंवा श्वासोच्छ्वासाच्या समस्या :** स्पीच फास्टिंग आधीच व्होकल कॉर्डच्या समस्या किंवा श्वास घेण्यास त्रास होत असलेल्या लोकांसाठी अपायकारक ठरू शकते.

**मानसिक आरोग्यविषयक चिंता :** चिंता, नैराश्यग्रस्त व्यक्ती, किंवा डिपोलर डिसऑर्डर असल्यास व्यक्ती यामुळे आधीच कोणाशी जास्त बोलत नाहीत. त्यामुळे अशा व्यक्तींसाठी दिवसभर शांत राहणे धोक्याचे ठरू शकते.

**नातेसंबंधांमध्ये गैरसमज आणि निराशा :** स्पीच फास्टिंगमुळे काही वेळा नातेसंबंधांमध्ये गैरसमज आणि निराशा येऊ शकते. विशेषत: जर तुमच्या सभोवतालच्या लोकांना तुमचे हेतू माहीत नसतील.

**लिहिणे किंवा शाब्दिक संकेत :** काही परिस्थितींमध्ये लिहिणे किंवा शाब्दिक संकेत वापरणे आवश्यक असू शकते. तुमच्या वैयक्तिक परिस्थितीचा विचार करा आणि गरज पडल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या.

■■■

# बदाम किती आणि कसे खावेत



बदाम खाण्याचे असंख्य आरोग्य फायदे आहेत. चांगली गोष्ट म्हणजे त्याची चव खूप छान लागते, त्यामुळे लहानांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांनाच ते आवडते. प्रत्येकजण बदाम वेगवेगळ्या प्रकारे खातात. असे मानले जाते की, रात्रभर भिजवलेले बदाम खाल्ल्याने आरोग्यास अधिक फायदे होतात. सध्या उन्हाळा सुरू असून बदाम गरम असल्याने शरीरातील उष्णता वाढू शकते असे मानले जाते.

उन्हाळ्यात बदामाचे सेवन कसे करावे, हा प्रश्न आहे. तर फॅट टू स्लिमच्या संचालिका पोषणतज्ज्ञ आणि आहारतज्ज्ञ शिखा अग्रवाल शर्मा यांनी उत्तर दिले आहे. कच्चे बदाम शरीरात उष्णता निर्माण करतात आणि उन्हाळ्यात त्यांचे सेवन केल्यास पित्त दोष होऊ शकतो.

शरीरातील उष्णतेमुळे तुम्हाला फोड, मूळव्याध आणि इतर परिस्थितींचा सामना करावा लागू शकतो. म्हणूनच कच्च्या बदामाऐवजी रात्रभर भिजवलेले बदाम खावेत. भिजवलेले बदाम हे पोषक तत्व शरीराद्वारे सहज शोषून घेण्यास मदत करतात.

**बदामाचे पौष्टिक मूल्य**

बदामामध्ये फायबर, प्रथिने, जीवनसत्त्वे आणि ओमेगा ३ फॅटी ॲसिडसारखे आवश्यक पोषक असतात. हे सर्व पोषक तत्व शरीराच्या चांगल्या कार्यासाठी आवश्यक आहेत. दररोज भिजवलेले बदाम खाल्ल्याने तुमच्या आरोग्यासाठी खालील फायदे होऊ शकतात.

**भिजवलेले बदाम गुणकारी**

उन्हाळ्यात पचनाच्या समस्या वाढतात आणि कच्चे बदाम खाल्ल्याने परिस्थिती बिघडू शकते. भिजवलेले बदाम हे पचायला सोपे नाही तर शरीरातील उष्णताही थंड करतात. बदाम भिजवल्याने पित्तदोष संपतो आणि पचनाच्या समस्याही दूर होतात.

**केस आणि त्वचेसाठी फायदेशीर**

बदामामध्ये व्हिटॅमिन ई मुबलक प्रमाणात असते, जे केस आणि त्वचेच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. तसेच नवीन पेशी तयार होण्यास मदत होते. बदामामध्ये भरपूर फायबर आणि प्रथिने असतात आणि ते रिकाम्या पोटी खाल्ल्यास दिवसभर पोट भरून राहतात.

**बदाम खाण्यापूर्वी सोलणे**

रात्रभर भिजवलेल्या बदामाची साल सकाळी काढून खावी. ज्यामुळे बदामाचे फायदे अधित होतात. बदामाच्या सालीमध्ये टॅनिन असते, जे शरीरातील पोषक तत्वांचे शोषण रोखते.

**रक्तातील साखर नियंत्रणात राहील**

बदामामध्ये प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे आणि चरबी भरपूर प्रमाणात असतात. बदाम खाणे मधुमेहाच्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर ठरू शकते. रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी बदाम मदत करते.

**दररोज किती बदाम खावेत**

जर तुम्ही नुकतेच बदाम खाण्यास सुरुवात केली असेल, तर तुम्ही दररोज २ भिजवलेले बदाम खाऊ शकता, १० दिवसांनंतर तुम्ही ५ पर्यंत वाढवू शकता, २१ दिवसांनी तुम्ही १०, ९० दिवसांपर्यंत खाऊ शकता. त्यानंतर रोज १२ ते २० बदाम खा.

# धावण्याच्या व्यायामाने हाडांची घनता वाढते



चेहऱ्यावर पडलेले डाग, सुरकुत्या या गोष्टी तुम्हाला अडचणी निर्माण करू शकतात. चेहऱ्यावर पडलेल्या डाग, सुरकुत्यांमुळे सुंदर चेहरा पण विद्रूप दिसू लागतो. वाढते वय, प्रदूषित वातावरण, अप्रकृतिक जीवनशैली, खाण्या पिण्यात अनियमितता या मुळे या समस्या होऊ शकतात. आहारामध्ये पोषण तत्वाच्या कमतरतेमुळे रक्तातील प्रोटीन्स कमी होतात किंवा राक्तातील दुसरे घटक कमी झाल्यामुळे या समस्येला सामोरे जावे लागू शकते.

कडक ऊन, केमीकल्सपासून बनवलेल्या क्रीम यांच्या वापरामुळे चेहऱ्यावर डाग होऊ शकतात. महिलांमध्ये हार्मोन्सच्या कमतरतेमुळे चेहऱ्यावर डाग, पुरळ होतात. या सर्व समस्यांवर एक घरगुती उपाय आहे. एक चमचा साय घेऊन त्यामध्ये दोन केशराच्या कड्या टाकून एक तास हे मिश्रण तसेच ठेवा. जेंव्हा त्या मिश्रणाचा रंग संत्रीसारखा पिवळा होईल तेंव्हा चेहऱ्यावर जिथे जिथे डाग, सुरकुत्या आहेत तेथे ५ ते १० मिनिट हे मिश्रण लावून हलक्या हाताने मालिश केल्यानंतर ३० मिनिट तसेच बसा. नंतर कोमट पाण्याने चेहरा स्वच्छ धूऊन घ्या. नियमित ७ दिवस हा प्रयोग केल्याने या समस्येपासून आराम मिळेल.


# नवीन पिढीचे अजब शब्द

**भाग १ :**

**आरशात बघून 'रिझ' (Rizz) काय शोधताय काका?**

काल आमचे शेजारी पांढरे काका मोठ्या काळजीत माझ्याकडे आले. म्हणाले, अगं कल्पिता, काल माझा नातू आरशासमोर उभा राहून स्वतःलाच म्हणत होता की, 'आज तुझा रिझ (Rizz) एकदम कडक आहे!' मला काळजी वाटतेय, याला कोणता नवीन आजार तर झाला नाही ना? की हा काहीतरी चुकीचं खाऊन आलाय?

काकांचा निरागस प्रश्न ऐकून मला हसू फुटलं. मी त्यांना शांत केलं आणि म्हटलं, काका, घाबरू नका! तुमच्या नातवाला कोणताही आजार झालेला नाही, उलट तो स्वतःचीच स्तुती करतोय.




आजच्या तरुण पिढीच्या बोलण्यातला हा एक परवलीचा शब्द आहे- 'रिझ' (Rizz). आता हा शब्द आला कुठून? तर हा शब्द इंग्रजीतील 'Charisma' (करिश्मा) या शब्दाच्या मधल्या भागातून (Cha-ris-ma) जन्माला आला आहे. पूर्वी आपण ज्याला 'छाप पाडणे', 'मोहक व्यक्तिमत्व' किंवा 'वक्तृत्व' म्हणायचो, त्याला आजची मुलं शॉर्टकटमध्ये 'रिझ' म्हणतात.

जर एखादा तरुण कोणालाही आपल्या बोलण्याने किंवा वागण्याने सहज प्रभावित करत असेल, तर त्याचे मित्र म्हणतात, भावा, तुझा रिझ खतरनाक आहे!

घराघरात होणारा शब्दांचा लोचा:

समजा, तुम्ही एखाद्या लग्नात खूप छान नटून गेलात आणि तुमच्या नातवाने म्हटलं, आजोबा, काय रिझ आहे तुमचा! तर दचकू नका. याचा अर्थ असा की तुमची 'टिप-टॉप' राहणी त्याला मनापासून आवडली आहे.

**आजचा धडा :**

आज घरी गेल्यावर तुमच्या मुलाला किंवा नातवाला म्हणा- काय बेटा, आज रिझ एकदम जोरात आहे वाटतं? मग बघा, तो तुमच्याकडे किती आश्चर्याने आणि कौतुकाने बघेल! भाषेची ही दरी कमी करायला या शब्दांची मदतच होणार आहे.

पुढच्या भागात आपण अशाच एका 'वाफाळलेल्या' शब्दाबद्दल बोलूया, ज्याचा चहाशी काहीही संबंध नाही!

**लेखक: कल्पिता**

# उन्हाळ्यात जास्त प्रमाणात थंड पाणी पिताय? मग, जाणून घ्या त्याचे गंभीर दुष्परिणाम

सध्या वातावरणातील उकाडा प्रचंड वाढला आहे. या वाढत्या उन्हाच्या झळांपासून बचाव करण्यासाठी अनेक जण थंड पाणी पितात. शरीराला हायड्रेट ठेवणारी पेय पिण्यावर अधिक भर देतो. हे सर्व योग्य असले तरी याचे मर्यादित प्रमाणात सेवन करणे गरजेचे आहे. अन्यथा आपल्या शरीराचे गंभीर नुकसान होऊ शकते.

उन्हाळ्यात खास करून उष्णतेपासून बचाव करण्यासाठी लोक थंडगार पाणी पितात. आपल्यापैकी अनेकांना कडक उन्हातून आल्यावर लगेच फ्रीजमधून बाटली काढून पाणी पिण्याची सवय असेल. हे थंडगार पाणी प्यायल्यामुळे शरीराला आराम मिळतो आणि उष्णता दूर होते.

परंतु, थंड पाणी प्यायल्यामुळे, तुम्हाला मिळणारा आराम हा तात्पुरता असतो. परंतु, जर तुम्ही थंडगार पाणी जास्त प्रमाणात पित असाल तर वेळीच सावध व्हा. कारण, सतत थंडगार पाणी पिणे हे आरोग्यासाठी हानिकारक आहे. या थंडगार पाण्यामुळे तुमचे वजन तर वाढतेच शिवाय, हृदयालाही हानी पोहचू शकते. हे थंडगार पाणी प्यायल्यामुळे आरोग्याचे काय नुकसान होते ? त्याबद्दल जाणून घेऊयात.



**डोकेदुखी आणि सायनस**

उन्हाळ्यात जर तुम्ही अनेकदा गरजेपेक्षा जास्त कोल्ड्रिंक्स किंवा थंड पाणी प्यायले तर त्यामुळे ब्रेन फ्रीझ ची समस्या उद्‌भवू शकते. या व्यतिरिक्त जास्त प्रमाणात आईसक्रीम खाल्ल्याने ही असे होऊ शकते. खरं तर थंड पाणी अधिक प्यायल्याने पाठीच्या कण्यामध्ये असलेल्या संवेदनशील नसांना थंड होतात. याचा थेट परिणाम मेंदूवर होते. ज्यामुळे, डोकेदुखी, आणि सायनसचा त्रास होऊ शकतो.

**घशामध्ये वेदना होणे**

जास्त प्रमाणात थंडगार पाणी प्यायल्यामुळे घसा खवखवणे, घशामध्ये वेदना होणे इत्यादी समस्या सुरू होतात. खरं तर थंड पाणी प्यायल्यामुळे शरीरात अतिरिक्त श्लेष्मा तयार होतो, जे श्वसनमार्गामध्ये जमा होते. यामुळे, धशामध्ये संक्रमण किंवा संसर्ग होऊन खोकला येऊ शकतो. तसेच, सर्दी ही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, उन्हाळ्यात शक्यतो थंड पाणी पिणे टाळावे.

**पचनाशी संबंधित समस्या**

या दिवसांमध्ये थंड पाणी जास्त प्रमाणात प्यायल्याने याचा आपल्या पचनसंस्थेवर परिणाम होतो. यामुळे, अन्न पचनाची समस्या निर्माण होते. पोट जड होते, पोटात गॅस होणे इत्यादी समस्या होऊ शकतात. मळमळ, बद्धकोष्ठता आणि पोट फुगणे यांसारख्या समस्या देखील होऊ शकतात.

**डिस्क्लेमर :** सदर लेख फक्त सामान्य माहितीसाठी आहे. अधिक तपशीलांसाठी तुम्ही तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊ शकता.

■■■

# टेंशनपासून मुक्ती मिळवण्यासाठी काही टिप्स

ताणतणाव येणं ही एक स्वाभाविक प्रक्रिया आहे. मात्र तणाव आपल्यावर हावी झाला तर तो एक आजाराचं रूप घेतो.

काही जण तणावावर सहजपणे मात करतात. मात्र ताण वाढल्यास अनेकांचं मनोधैर्य खचतं. त्याचा परिणाम कामावर आणि खाजगी आयुष्यावरही होतो.

जर आपण आपल्या दिनचर्येत थोडासा बदल केला तर इच्छाशक्तीद्वारे तुम्ही ताणावर नियंत्रण मिळवू शकता. जाणून घ्या त्यासाठीच काही टीप्स..

ताणतणावापासून पूर्णपणे मुक्ती मिळविण्यासाठी आपल्या दररोजच्या आयुष्यात व्यायामाला अतिशय महत्त्वाचं स्थान द्या. नियमित व्यायाम केल्यानं ताण कमी होण्यास मदत मिळते. जर सकाळी शक्य नसेल तर किमान संध्याकाळी वॉकला जा.



जर आपण एखाद्या आजारानं किंवा शरीरातील बदलामुळं तणावग्रस्त आहात, तर तज्ज्ञांचा सल्ला घ्या. उदा. डोक्यावर केस गळत आहेत, याचं टेंशन तुम्ही घेतलं असेल तर काळजी करण्यापेक्षा त्यावर उपाय करा, हेअर ट्रान्सप्लांट करा, औषधं घ्या आणि प्राणायाम करा. जेवणात प्रोटीन असलेले पदार्थ असू द्या.

जर आपल्यासोबत काहीसं असं घडत असेल, ज्याचा विचार करून आपला ताण वाढतोय. तर आपल्या आयुष्यातील या नकारात्मक घटना दूर सारा आणि त्याचा विचार न करता चांगल्या गोष्टींचा विचार करा.

जर नवरा – बायकोच्या नात्यात ताणतणाव असेल तर आपल्या जवळच्या मित्रांसोबत किंवा घरातील मंडळींसोबत चर्चा करा. आपण यासाठी मॅरेज काउंसलरची मदत घेऊ शकता.

आर्थिक परिस्थितीच्या कारणानं तणावग्रस्त असाल तर शांत डोक्यानं आपल्याजवळ किती पैसा आहे आणि कायदेशीर मार्गानं आपण आपला इन्कम कसा वाढवू शकतो, याबाबत विचार करा. उगाच टेंशन घेत बसू नका.

**छान छान गोष्टी...**

# बादशहाची मिशी ओढणारास काय शिक्षा

एकदा भरलेल्या दरबारात बादशहा अकबरने सर्वांना एक प्रश्न विचारला. बादशहा म्हणाला, ‘आज सकाळी कोणीतरी माझी मिशी जोरजोरात ओढली. मला चापट्या मारल्या आणि माझ्या पोटावर लाथाही मारल्या. त्याला काय शिक्षा करावी ?

सर्वजण विचारात पडले. महाबलाढ्य बादशहाशी असे कोण वागू शकेल ? बादशहाची मिशी ओढण्याची हिम्मत कोण करील ? पोटात लाथ कोण मारील ? आणि एवढे सगळे होऊनही बादशहा गप्प कसा राहिला ?


एक सरदार म्हणाला जर हुजूरांशी कोणी असे उन्मत्तपणाचे वर्तन केले असेल, तर त्याला कठोर शासन केले पाहिजे. प्राणदंड्च दिला पाहिजे किंवा हात कलम करुन टाकले पाहिजेत. बाकी सर्व; सरदार या मताशी सहमत झाले. अशा गुन्हेगाराला एकदम कठोर शासन झाले पाहिजे. यावर सर्वांनी जोर दिला. एकटा बिरबल काही न बोलता गप्प बसला होता. बादशहाने त्याला विचारले, बिरबल, तुला तुझे काय म्हणणे आहे ? बिरबल म्हणाला, हुजूर, आपल्याबरोबर असे वर्तन करणाऱ्याला काही शिक्षा नाही, तर गोड बक्षीस दिले पाहिजे.

यावर सर्व दरबारी बिरबलकडे आश्चर्याने पाहू लागले. शिक्षेऐवजी बक्षीस दिले पाहिजे ? काय हा मूर्खपणा असे भाव त्यांच्या नजरेत होते. बिरबल हसून म्हणाला, हुजूर, आपली मिशी ओढण्याची, पोटावर लाथा मारण्याची जुर्रत आपण आपल्या मांडीवर घेतलेले एक लहान, अजाण बालकच करु शकते. अशा बालकाला काहीतरी गोड बक्षीसी देण्याखेरीज आणखी काय करणार ?

बादशहा प्रसन्नपणे हसला. बाकी दरबाऱ्यांच्या माना खाली गेल्या.

■■■

# साफसफाई केल्यानंतरही बाथरुममधून दुर्गंधी येतेय?



बाथरूममधून दुर्गंधी येणे सामान्य आहे. कितीही स्वच्छता केली तरी काही वेळा बाथरूममधून दुर्गंधी येऊ शकते. बाथरूममधून दुर्गंधी अधिक येते. ओलवा किंवा ओलसरपणामुळे दुर्गंधी येणे स्वाभाविक आहे. दुर्गंधी दूर करण्यासाठी, लोक त्यांच्या घराच्या बाथरूममध्ये विविध महागड्या उत्पादनांचा वापर करतात. रूम फ्रेशनरपासून ते साफसफाईच्या अनेक उत्पादनांपर्यंत लोक बाथरुमचा वास दूर करण्याचा प्रयत्न करतात. पण, असे क्वचितच घडते की या उत्पादनांमुळे, स्नानगृह किंवा शौचालयाचा वास कायमचा निघून जातो. म्हणूनच इथे तुम्हाला बाथरूमची दुर्गंध दूर करण्याचे काही उपाय सांगितले आहेत.

**बाथरूमधील दुर्गंध दूर करतील हे उपाय**

**सुंगधित सप्रे घरीच तयार करा** : बाजारात सुगंधित स्प्रेचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत, परंतु सुगंध कायम राहण्यासाठी तुम्ही घरच्या घरी बाथरूमसाठी सुगंधित स्प्रे सहज बनवू शकता. यासाठी, दोन कप पाण्यात ६ ते ८ चमचे आवश्यक तेल मिसळा आणि हे द्रव एका स्प्रे बाटलीमध्ये ठेवा आणि बाथरूममध्ये स्प्रे करा.

**एग्जॉस्ट फॅन** : बाथरूममध्ये दुर्गंधी येण्याचे एक कारण हवा खेळती नसणे हे देखील असू शकते. बाथरूममध्ये एक्झॉस्ट फॅन असल्याने हवा आत बाहेर सहज येऊ शकते. वेंटिलेशनसाठी बाथरूममध्ये एक्झॉस्ट फॅन लावा. फॅन बसवण्यात अडचण आल्यास खिडकी बनवता येईल.

**कचरा साफ करा** : जर लोकांनी वारंवार वापरल्या जाणाऱ्या गोष्टी बाथरूममध्ये तशाच ठेवल्या तर कचरा तयार होतो. शॅम्पूच्या रिकाम्या पिशव्यांप्रमाणे, अनेक उत्पादनांच्या रिकाम्या बाटल्या, हे सर्व बाथरूमच्या बाहेर ठेवा. बाथरूम स्वच्छ आणि नीटनेटके ठेवा. बाथरूम नियमितपणे स्वच्छ ठेवणे आणि ओले झाल्यावर ते कोरडे केल्याने दुर्गंधी दूर राहण्यास मदत होते.

**कॉफी बीन्स वास दूर करेल** : जर तुम्हाला बाथरूममधून येणारा वास दूर करायचा असेल तर तुम्ही कॉफी बीन्सची मदत घेऊ शकता. यासाठी एका मोठ्या भांड्यात पाणी घ्या आणि त्यात कॉफी बीन्स मिक्स करा. ही वाटी बाथरूममध्ये ठेवा. दुर्गंधी दूर होताच संपूर्ण बाथरूमचा चांगला वास येऊ लागतो.

# नाष्टा करणाऱ्या गर्भवतींची प्रकृती चांगली राहते

रात्रभर पोट रिकामे असल्याने सकाळी उठल्या उठल्या व्यक्तीला भूक लागते. त्यामुळे पोटभर न्याहारी करणे आवश्यक ठरते. विशेषत: महिलांना सकाळी चांगली न्याहारी करणे हे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण त्यांनी योग्य न्याहारी न केल्यास त्याचा परिणाम गर्भधारणेवर होऊ शकतो. संध्याकाळपेक्षा सकाळी चांगले उष्मांक देणारे पदार्थ घेणे आवश्यक असते. त्यामुळे गर्भधारणेबाबत उद्‌वणाऱ्या अडचणी टाळता येतात. जेरूसलेम येथील हिब्रू विद्यापीठ आणि तेल अवीव विद्यापीठातील संशोधकांनी न्याहारी आणि गर्भधारणा या विषयावर व्यापक संशोधन केले. रोज चांगली न्याहारी करणाऱ्या गर्भवतींची प्रकृती चांगली राहते. महिलांच्या आरोग्यावर भोजनाचा काय परिणाम होतो याचा बारकाईने अभ्यास करण्यात आला. पॉलिसिस्टिक ओहरी सिंड्रोम (पीसीओएस) या विकाराने आजारी असलेल्या व्यक्तींच्या इन्सुलिन निर्मितीमध्ये अडथळे निर्माण होतात. त्याचा परिणाम डोक्यावरचे केस गळण्यावर होतो तर शरीरावर अनावश्यक केसांचे प्रमाण वाढते. वॉल्फसन मेडिकल सेंटरमध्ये २५ ते ३९ वोगटांतील ६० महिलांवर १२ आठवडे प्रयोग करण्यात आले.

**जाहिर निविदा सुचना बी-१, निविदा सुचना क्र.०४ सन २०२५-२६**
**ग्रामपंचायत कार्यालय नवलाख उंब्रे ता.मावळ,जि.पुणे**

ग्रामपंचायत कार्यालय,नवलाख उंब्रे ता.मावळ,जि.पुणे वतीने प्रशासक/ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय नवलाख उंब्रे ता.मावळ यांचे तर्फे खालील कामाचे नावासमोर रकाना क्रं. ६ मध्ये नमुद केलेप्रमाणे ग्रामविकास विभाग/जिल्हा परिषद/सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे तसेच योग्य पुरवठा धारक यांचे कडील पंजीकरण केलेल्या योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार, वर्ग १ ते ७ व पुणे जि.प.नोंदणीकृत सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांचेकडुन दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या निविदा मागविण्यात येत आहेत..

| अ क्रं | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम (GST) सह रु | निविदा फी रु. | बयाणा फी | आवश्यक कंत्राटदार | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे नवलाख उंब्रे लक्ष्मण नरवडे ते सुनिल घोलप यांच्या घरापर्यंत बंदिस्त गटर करणे ता.मावळ | ६३९८८७/- | ५९०/- | ६३९८/- | जि.प.नोंदणीकृत खुला | ३ महिने |
| २ | मौजे नवलाख उंब्रे येथील आण्णाभाऊ साठे नगर येथे बंदिस्त गटर करणे ता.मावळ | ४९९४८७/- | ५९०/- | ४९९४/- | जि.प.नोंदणीकृत खुला | ३ महिने |

सुचना- कोणतेही कारण न देता निविदा अथवा सर्वच निविदा नाकारणेचा किंवा रद्द करणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखुन ठेवला असुन निविदा भरणाऱ्या ठेकेदाराला निविदा फेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.कोऱ्या निविदाचा नमुना मा.सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत नवलाख उंब्रे.ता. मावळ यांचेकडुन दि.०२/०४/२०२६ ते दि.०८/०४/२०२६ सकाळी १०.०० ते ५.०० वा.सुटटीचे दिवस सोडुन देण्यात येतील.प्रशासक/ग्रा.पं.अधिकारी हे भरुन पाठविलेल्या निविदा दि.०२/०४/२०२६ ते दि.०८/०४/२०२६ सकाळी १०.३० ते ५.०० वा.पर्यत सुटटीचे दिवस सोडुन ०२ पाकीटे पध्दतीने स्विकारतील आणि दि.०९/०४/२०२६ रोजी सकाळी ११.३० वा.निविदा उघडल्या जातील.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत नवलाख उंब्रे ता.मावळ

प्रशासक
ग्रामपंचायत नवलाख उंब्रे ता.मावळ

# महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम वर्षभर आयोजित करा ; मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांची ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ हा कालावधी द्विशताब्दी जयंती वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. या द्विशताब्दी वर्षानिमित्त त्यांचे कार्य, विचार पुढील पिढीपर्यंत प्रभावीपणे नेण्याची संधी असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कार्यावर आधारित विविध कार्यक्रमांची वार्षिक दिनदर्शिका बनवून वर्षभर कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्याचे निर्देश दिले.

मंत्रालयात आयोजित क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे करण्यासाठी गठीत समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, इमाव बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गठीत समितीमध्ये संलग्नित विभागाने किमान दोन ते तीन कार्यक्रमांचे आयोजन करावे. अशा प्रेरक कार्यक्रमांचे नियोजन १५ एप्रिल पर्यंत देण्यात यावे. महात्मा जोतिराव फुले यांचे मूळ गाव खानवडी (ता. पुरंदर, जि. पुणे) येथील त्यांच्या स्मृती जपणाऱ्या जिल्हा परिषद शाळेचा कायापालट करण्यात आला आहे. या द्विशताब्दी जयंती वर्षाची सुरुवात ११ एप्रिल रोजी सीबीएससी शिक्षण, आधुनिक सुविधांनी युक्त खानवडी जिल्हा परिषद शाळेच्या लोकार्पण कार्यक्रमाने करावी.

यासाठी गठीत मंत्री समितीच्या अंतर्गत वर्षभर कार्यक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करणे, या कार्यक्रमांचे संनियंत्रण करण्यासाठी उपसमितीची निर्मिती करावी. महात्मा जोतिराव फुले यांच्या जीवन कार्यावर आधारित असलेल्या साहित्य संपदेचा बहुभाषेत अनुवाद झाला पाहिजे. जेणेकरून सबंधित भाषिक नागरिकांना त्यांच्या भाषेत साहित्य उपलब्ध होईल. शालेय शिक्षण विभागाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये खासगी शाळांनाही सहभागी करून घ्यावे. प्रत्येक मंत्री, विभागाने दिलेल्या सूचनांचे एकत्रीकरण करून त्यावर आवश्यक कार्यवाही करावी.

यावेळी सबंधित मंत्री यांनी आपल्या विभागाकडील नियोजनाची माहिती दिली. तसेच हे द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त घ्यावयाच्या कार्यक्रमांबाबत सूचना दिल्या. सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे यांनी बैठकीत माहिती दिली.

## विरोधकांनी 'तोंडाच्या वाफा' टाकू नयेत, पुरावे असतील तर एसआयटीकडे द्या : मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : विरोधक केवळ जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करत आहेत. त्यांनी केवळ 'तोंडाच्या वाफा' टाकू नयेत, पुरावे असतील तर एसआयटीकडे द्यावेत असे खडे बोल सुनावत खरात प्रकरण आणि राज्यातील विविध संवेदनशील मुद्द्यांवरून राजकारण करणाऱ्या विरोधी नेत्यांचा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज कडक शब्दांत समाचार घेतला.

खरात प्रकरणाच्या चौकशीबाबत बोलताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, अतिशय संवेदनशील प्रकरणाची एसआयटी चौकशी सुरू आहे. रोहित पवार आणि विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांमध्ये विधाने करण्यापेक्षा त्यांच्याकडे असलेले पुरावे एसआयटीला द्यावेत. केवळ प्रसिद्धीसाठी आणि स्वत:ची किंमत वाढवण्यासाठी जनतेमध्ये कल्लोळ निर्माण करण्याचे काम त्यांनी करू नये. खरात यांची पत्नी फरार असल्याच्या प्रश्नावर ते म्हणाले, महाराष्ट्र पोलीस सक्षम असून त्यांना शोधून काढतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

एकनाथ खडसे यांनी सरकार पडण्याबाबत केलेल्या विधानावर टीका करताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, महायुती सरकार हे ५१ टक्के मते मिळवून सत्तेवर आले आहे. हे काही अल्पमतातले सरकार नाही. त्यामुळे खडसे साहेबांनी सरकार पडण्याच्या भ्रमात राहू नये. कायद्याच्या राज्यात गुन्हेगार कितीही मोठा असला तरी त्याला शिक्षा होईलच, पण अशा घटनांमुळे सरकार पडत नसते.

वंदे मातरम गाताना खुर्चीत बसून राहिल्याच्या कथित व्हिडिओवरून बावनकुळे यांनी राहुल गांधींवर टीका केली. त्यांच्यावर राष्ट्रगीताचे आणि वंदे मातरमचे संस्कारच नाहीत, असे ते म्हणाले.

## ६ युरिया व डीएपी खतांचा आरक्षित साठा एप्रिल व मे महिन्यात तयार ठेवावा : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई : खरीप हंगाम २०२६ करिता युरिया व डीएपी खतांचा आरक्षित साठा एप्रिल व मे महिन्यात तयार ठेवावा करावा यासाठी कृषी विभागाने काटेकोर नियोजन करावे. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत खतांची कमतरता भासणार नाही याची दक्षता घ्यावी .कोणत्याही कंपनीने किंवा विक्रेत्याने खतांसोबत इतर उत्पादने घेण्याची सक्ती करू नये असे निर्देश कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर राज्यातील खतांची उपलब्धता आणि नियोजनाचा आढावा घेण्यासाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली.यावेळी



कृषि विभागाचे सचिव परिमल सिंह, संचालक कृषी सुनिल सी. बोरकर यासह विविध खत कंपन्याचे अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, खत उत्पादक व पुरवठादार कंपन्यांनी खते उपलब्ध होण्यापूर्वी कृषी विकास अधिकारी यांचेकडून तालुकानिहाय पुरवठ्याचे नियोजन प्राप्त करून घ्यावे व त्यानुसार विक्रेत्यांना वाटप करावे.खत पुरवठा कंपन्यांनी घाऊक विक्रेत्यांकडे खताचा साठा शिल्लक राहणार नाही याची दक्षता घेऊन थेट अथवा घाऊक विक्रेत्यामार्फत किरकोळ खत विक्रेत्यांना खत पुरवठा करण्यास प्राधान्य द्यावे.घाऊक विक्रेत्यांना ज्या जिल्ह्यासाठी खत आवंटन दिले आहे त्या त्यांना जिल्ह्याबाहेर युरिया व डीएपी खताची विक्री करता येणार नाही. ज्या विक्रेत्यांना खत नियंत्रण समिती प्रणालीवर २० मे टन किंवा जास्त खत साठा शिल्लक आहे अशा खत विक्रेत्यांना नवीन खत पुरवठाकरून नये.खतांची विक्री पॉस मशीनवर रियल टाईमवर करावी.

## पाटण येथे आजपासून 'कोयना दौलत डोंगरी महोत्सव' : पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : शासनाचा पर्यटन विभाग, जिल्हा प्रशासन सातारा आणि विभागीय पर्यटन संचालनालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पाटण, जि. सातारा येथे २ ते ६ एप्रिल २०२६ या कालावधीत 'कोयना दौलत डोंगरी महोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात येणार आहे. 'कोयना दौलत डोंगरी महोत्सव २०२६'मुळे स्थानिक पर्यटनाला चालना मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. या महोत्सवात नागरिक, शेतकरी, पर्यटक आणि उद्योजकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या महोत्सवामध्ये २ एप्रिलला शाहिरी पोवाडा कार्यक्रम, ३ एप्रिलला भजनी मंडळ कार्यक्रम, ४ एप्रिलला ब्रास बँड पथकाचा थरार व ५ एप्रिलला लावणी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमांबरोबरच आनंदमेळा, बोटींग, घोडेस्वारी, पॅराग्लायडिंग, उंट सफारी पर्यटकांना अनुभवता येणार आहे. आनंदमेळा, शस्त्र प्रदर्शन, इलेक्ट्रीक बग्गी, कार्निवल परेड, कृषी प्रदर्शन, खाद्यजत्रा, पशु–पक्षी प्रदर्शन महोत्सवाचे खास आकर्षण ठरणार आहे. त्याचबरोबर महोत्सवामध्ये महिला बचतगटांना दालन उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. 'कोयना दौलत डोंगरी महोत्सव २०२६'मध्ये मनोरंजन विश्वातील कलाकार उपस्थित राहणार आहेत. संस्कृती बालगुडे, जान्हवी किल्लेकर, स्पृहा जोशी, भाऊ कदम, भारत गणेशपुरे, प्रियदर्शन



जाधव, कुशल बद्रिके, हेमांगी कवी, गायक रोहित राऊत, गायिका जुईली जोगळेकर, गायक अभिजीत जाधव–आमु जाधव आदी कलाकार महोत्सवामध्ये सहभागी होतील. यासोबतच योग, ध्यान आणि आयुर्वेदिक उपचारांच्या माध्यमातून आरोग्य पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाईल, तर पॅराग्लायडिंग, पॅरामोटरिंग, जेटस्की जलक्रीडा, ट्रेकिंग, रॉक क्लायंबिंग आणि सीप्लॅन राईड यासारख्या साहसी उपक्रमांमुळे पर्यटकांना रोमांचक अनुभव घेता येणार आहे.

या महोत्सवादरम्यान पर्यटकांना स्थानिक संस्कृती, परंपरा आणि पर्यटनाची विविध रूपे अनुभवता येणार आहेत. महोत्सवात स्थानिक लोककला, पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रम आणि नामांकित कलाकारांचे विशेष सादरीकरण आयोजित केले जाणार आहे. तसेच पर्यटकांना ग्रामीण जीवनशैलीचा जवळून परिचय करून देण्यासाठी कृषी पर्यटनाशी संबंधित उपक्रम राबविले जातील. राज्याच्या पर्यटन धोरणाच्या अनुषंगाने स्थानिक महिला सशक्तीकरण, युवा पर्यटन आणि साहसी पर्यटनाला चालना देण्यासाठी मार्गदर्शनपर चर्चासत्रे आयोजित केली जातील. सह्याद्रीतील ऐतिहासिक गड–किल्ल्यांच्या वारशाचा परिचय करून देणाऱ्या विशेष पर्यटन सहली तसेच परिसरातील प्रेक्षणीय स्थळे आणि प्राचीन मंदिरांच्या भेटींचे आयोजनही करण्यात येणार आहे.

स्थानिक महिला बचतगटांच्या हस्तकला आणि कलाकृतींचे प्रदर्शन व विक्री, तसेच सातारा जिल्ह्यातील पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे दर्शन घडविणारे पाककृती प्रदर्शन हेही महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. याशिवाय बोटींग शर्यह, छायाचित्र आणि चित्रकला स्पर्धा तसेच विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असून पर्यटन क्षेत्रातील भागधारक, ट्रॅव्हल एजंट, टूर ऑपरेटर्स आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर यांच्यासाठी विशेष परिचय सहल (ऋश्ञ ढ्ढी) देखील आयोजित केली जाणार आहे.

## अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी २ ते ८ एप्रिलदरम्यान 'महा-साधना सप्ताह'!

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : भारत सरकार, क्षमता विकास आयोग (CBC) आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत साधना सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. देशातील शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अधिक कार्यक्षम बनविणे, भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे आणि तंत्रज्ञानाची सवय आपल्या कामकाजात करुन त्यांना सक्षम करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

केंद्र शासनाने साधना सप्ताह उपक्रम राबविण्याच्या सूचना सर्व राज्यांना दिल्यानंतर आता राज्यातही महा–साधना सप्ताह २ ते ८ एप्रिल या काळात आयोजित करण्यात आला आहे. टेक लर्निंग वीक अंतर्गत ८ लाख ८० हजारांहून अधिकारी आणि कर्मचारी ७ दिवसांत किमान ४ तासांचे अभ्यासक्रम ळक्ष्जढ कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन पूर्ण करणार आहेत. यामुळे जवळपास ३५ लाखांहून अधिक वेळ अधिकारी आणि कर्मचारी iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर वेगवेगळे अभ्यासक्रम शिकतील. यामध्ये राज्यातील ३६ जिल्हे, ३२ विभाग, आणि ६ विभागीय कार्यालये यामध्ये विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी महासाधना सप्ताहात सहभाग नोंदविणे गरजेचे असेल.

साधना सप्ताह हा iGOT कर्मयोगी भारत अंतर्गत राबविला जाणारा एक विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आहे. हा उपक्रम Mission Karmayogi चा एक भाग असून शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृध्दीसाठी आणि तंत्रज्ञानदृष्टया सक्षम करण्यासाठी आयोजित केला जातो. एक आठवडाभर आयोजित केला जाणारा हा उपक्रम पूर्णपणे ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम आहे. यामध्ये शासनाच्या विविध विभागांतील काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी आपल्या स्वत:च्या कामाशी संबंधित नवीन कौशल्ये, तंत्रज्ञान आणि कार्यालयीन कामकाज सुकर होण्याच्या पध्दती शिकतात. शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविणे, डिजिटल गव्हर्नन्स आणि नवतंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, सतत शिक्षण घेत राहणे,वेळ व्यवस्थापन ही सप्ताह आयोजित करण्यामागची मुख्य उद्दिष्टे असल्याने या सप्ताहात प्रत्येकाने स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी राज्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केले आहे.

महा–साधना सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे iGOT Karmayogi -pp द्वारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपल्या वेळेनुसार प्रशिक्षण घेता येईल. अधिकारी आणि कर्मचारी आपले काम सांभाळून हे अभ्यासक्रम पूर्ण करणार असल्याने कामकाजावर परिणाम न होता अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कौशल्यवृध्दी होण्यास मदत होईल.या अभ्यासक्रमांमुळे प्रत्येकाला स्वत:ची क्षमता ओळखून त्यानुसार कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळते.

बदलत्या काळाशी सुसंगत राहण्यासाठी शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नवीन कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. आजच्या शासकीय कामकाजात सुद्धा विविध डिजिटल प्रणाली, प्सचा वापर होत आहे. महा–साधना सप्ताहामुळे प्रशासनात डिजिटल सक्षमता वाढविण्यास मदत होणार आहे. नवीन तंत्रज्ञानाचा शासकीय कामकाजात वापर, नागरिक केंद्रित सेवा आणि पारदर्शकता वाढविण्यास या सप्ताहाची मदत होणार आहे.

## आम्ही कोणाच्याही पक्षाला नुकसान पोहोचविण्यासाठी सुपारी दिली, हा आरोप बालिशपणा : आमदार शशिकांत शिंदे

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : आम्ही कोणाच्याही पक्षाला नुकसान पोहोचविण्यासाठी सुपारी दिली, असा आरोप करणं हा निव्वळ बालिशपणा आहे. खरं तर त्यांना कोण अडचणीत आणतंय, याचा शोध त्यांनी त्यांच्या मित्रपक्षात घ्यावा, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार शशिकांत शिंदे यांनी मुंबई येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे.

शशिकांत शिंदे बोलताना म्हणाले की, अजितदादांच्या विमान दुर्घटनेत ब्लॅक बॉक्सचा अहवाल अद्याप आलेला नाही, उखऊ चौकशीचा खुलासा नाही मग सत्य बाहेर कसं आणि केव्हा



येणार? रोहित पवार यांनी व्यक्त केलेल्या शंकांच तपास यंत्रणांनी गंभीरपणे विचार करणं गरजेचं आहे.असे शशिकांत शिंदे यांनी बोलताना म्हटले आहे.

शशिकांत शिंदे म्हणाले की,भोंदू अशोक खरात प्रकरणामध्ये काही मोठ्या नेत्यांच्या फोटोवर 'फुल्या चर्चा आहेत, चौकशी झाली पाहिजे,अंधश्रद्धेविरोधी कायदा अधिक कडक करण्याची गरज आहे, अशी परिस्थिती निर्माण होत आहे. तसंच धर्माच्या नावावर समाजात तेढ निर्माण करणारी वक्तव्ये टाळली पाहिजेत,अन्यथा समाजात तणाव वाढू शकतो. असेही शशिकांत शिंदे यांनी बोलताना स्पष्टपणे सांगितले.

पुढे बोलताना शशिकांत शिंदे म्हणाले की,राष्ट्रवादी एकत्रीकरणाबाबत पूर्वी चर्चाच झाली नव्हती असं सांगितलं जात होतं, पण आता ती चर्चा झाली होती हे मान्य करण्यात आलं आहे. आम्ही एकत्रीकरणाबाबतचा विषय थांबवला असून सध्या आमचा पक्ष बळकट करण्यावर आमचा भर आहे. असे शशिकांत शिंदे म्हणाले.

# कला विश्व

## मी खूप प्रभावीत झालो, विकी कौशलनं केलं आदित्य धर व रणवीर सिंहचं कौतुक

आदित्य धर लिखित व दिग्दर्शित 'धुरंधर २'ची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. चित्रपट प्रदर्शित झाल्याच्या पहिल्या दिवसापासून प्रेक्षक सिनेमा पाहण्यासाठी मोठ्या संख्येनं थिएटरमध्ये गर्दी करीत आहेत. त्यामुळे आतापर्यंत या चित्रपटानं कोट्यवधींचं कलेक्शन केलं आहे. परदेशातही 'धुरंधर २'ला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतोय. रणवीर सिंहची मुख्य भूमिका असलेल्या 'धुरंधर २'चं अनेक जण कौतुक करत आहेत. रणवीरच्या चाहत्यांना चित्रपटातील त्याचं काम खूपच आवडलं असून, सोशल मीडियावर सध्या रणवीर अनेकांच्या चर्चेचा विषय आहे. तर चित्रपटातील त्याचे संवाद, सीन सर्व व्हायरल होत



आहेत. फक्त त्याचे चाहतेच नव्हे, तर मनोरंजन विश्वातील कलाकार मंडळींनासुद्धा अभिनेत्याचं काम खूप मोठ्या प्रमाणात आवडलं आहे. आतापर्यंत अनेकांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करीत त्याचं कौतुक केलं. अशातच आता बॉलीवूडमधील आघाडीचा अभिनेता विकी कौशलनंही 'धुरंधर २'मधील रणवीरच्या कामाचं कौतुक केल आहे. विकी कौशल सोशल मीडियावर खूप सक्रिय असतो आणि अनेकदा त्याला आवडलेल्या, तसेच त्याच्या कलाकार मित्रांच्या चित्रपटांचं तो कौतुक करत असतो. अशातच आता विकीनं 'धुरंधर २' पाहिल्यानंतरची त्याची प्रतिक्रिया दिली आहे. विकीनं यापूर्वीसुद्धा 'धुरंधर'चं कौतुक केलं होतं. 'धुरंधर २'चा टीझर रिलीज झाल्यानंतर त्यानं त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवरून तो शेअरही केला होता. आता अखेर चित्रपट प्रदर्शित झाल्याच्या काही दिवसांनंतर त्यानं त्याबद्दलची त्याची प्रतिक्रिया कळवली आहे. विकी कोशलनं इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर करत रणवीर, आर. माधवन, आदित्य धर, राकेश बेदी या सर्वांचं कौतुक केलं आहे. यावेळी त्यानं रणवीरच्या फिटनेसमुळे तो प्रभावीत झाल्याचंही म्हटलं आहे. विकी या पोस्टमधून आधी दिग्दर्शक आदित्य धरचं कौतुक करत म्हणाला, आदित्य धर तुझा मला खूप अभिमान वाटतो आणि तुझ्या कामामुळे मी खूप प्रभावीत झालो आहे. प्रचंड मेहनत आणि प्रामाणिकपणे तू हा चित्रपट बनवला आहेस. चित्रपटाला मिळत असलेल्या यशाच्या प्रत्येक क्षणासाठी तू पात्र आहेत. अभिनंदन भाऊ. विकी पुढे चित्रपटातील मुख्य अभिनेता रणवीरचं कौतुक करत म्हणाला, तू मला प्रेरणा दिली आहेस. तुझा फिटनेस आणि कलाकार म्हणून तुझा वावर कमाल आहे. पुढे 'धुरंधर २'मधील इतर कलाकारांबद्दल विकी म्हणाला, आर. माधवन तुम्हाला स्क्रीनवर पाहताना मजा आली. राकेश बेदी तुम्ही कमाल आहात. विकीनं पुढे चित्रपटाच्या एडिटिंगचं, एडिटरचं आणि निर्मात्यांसह इतर सदस्यांचंही कौतुक केलं आहे.

## प्रियांका चोप्राने सुवर्ण मंदिरात जमिनीवर बसून घासली भांडी; 'देसी गर्ल'वर कौतुकाचा होतोय वर्षाव

'देसी गर्ल' प्रियांका चोप्रा सध्या तिच्या आगामी प्रोजेक्टच्या शूटिंगसाठी भारतात दाखल झाली आहे. ऑस्कर सोहळ्यातील ग्लॅमरस उपस्थितीनंतर प्रियांकाने थेट अमृतसर गाठले. अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात प्रियांकाने कडेकोट सुरक्षेत दर्शन घेतले. डोक्यावर ओढणी आणि साध्या पेहरावात आलेल्या प्रियांकाने चाहत्यांना अभिवादन केले. मात्र, सर्वांचे लक्ष वेधले ते तिने केलेल्या सेवेने. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये प्रियांका चोप्रा इतर महिलांबरोबर जमिनीवर बसून भांडी घासताना दिसत आहे. प्रियांका चोप्रा सध्या भारतात आहे. काही दिवसांपूर्वी ऑस्कर सोहळ्यात प्रेझेंटर म्हणून हजेरी लावणाऱ्या प्रियांका चोप्राचा अमृतसहमधील एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. प्रियांका चोप्रा अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात दर्शनासाठी पोहोचली. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये ती कडेकोट सुरक्षेत मंदिरात जाताना दिसत आहे. प्रियांका चोप्राने डोक्यावर ओढणी घेतली होती. यावेळी तिने तिच्या चाहत्यांना अभिवादन केले. मंदिरात चाहते तिच्याभोवती जमा झाले आणि गर्दी केली. काही तिच्या मागे चालू लागले. या व्हिडीओमध्ये, फोटो काढण्यासाठी जवळ आलेल्या एका चाहत्याबरोबर पोज देण्यासाठी ती काही क्षण थांबतानाही दिसते. सोशल मीडियावर सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असलेल्या



आणखी एका व्हिडीओमध्ये, प्रियांका चोप्रा जमिनीवर बसून सेवा करताना दिसत आहे. तिने मंदिरातील इतर महिलांबरोबर भांडी घासली. सुवर्ण मंदिरातील परंपरेनुसार, तिने इतर महिलांसोबत मिळून तेथील भांडी घासली आणि सेवेत सहभाग घेतला. हॉलिवूडमध्ये स्वत:ची ओळख निर्माण करणाऱ्या प्रियांकाने नुकतेच तिच्या करिअरबद्दल भाष्य केले. एका पॉडकास्टमध्ये बोलताना तिने बॉलिवूडमध्ये यशाच्या शिखरावर असताना तिने इंडस्ट्री का सोडली, त्यामागचं कारण सांगितलं. ती म्हणाली, भारतात काम करताना मला थोड्या मर्यादा जाणवू लागल्या होत्या. मला जगभरात अजून काय काय आहे, हे पाहायचं होतं. कोणताही प्रवास सोपा नसतो. प्रत्येकाला आपापला संघर्ष करावा लागतो. मला एकाच गोष्टीत अडकून राहायला आवडत नाही. जेव्हा आयुष्यात अडचणी येतात, तेव्हा आपण स्वतःला सावरून पुन्हा उभं राहिलं पाहिजे. थोडा वेळ दु:खी राहिल्यानंतर पुढे जाणं आवश्यक आहे. मी माझ्या करिअरमध्ये अनेकदा असं केलं आहे.

* मुख्य संपादक – संजय प्रल्हाद भोकरे * संपादक –सिद्धार्थ संजय भोकरे * सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे–४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०–२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com